मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २८४ | शनिवार, २७ जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ४ | RNI MAHMAR/2023/89514

# शेतकऱ्यांना लग्नसराईसाठी माफक दरात एसटी बसेस

**मुंबई :** शेतकरी कुटुंबांना लग्नसराईप्रसंगी माफक दरात एसटी बसेस उपलब्ध करून देण्याची अभिनव योजना राबविण्याचा विचार शासन करत आहे. तसेच राज्यात अवैध प्रवासी वाहतुकीमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी मालवाहतूक वाहनांतून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा वाहनांचे परवाने रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबत ठाकरे गटाचे विधान परिषदेचे सदस्य सुनील शिंदे यांनी लक्षवेधी सूचना मांडली. यावेळी चर्चेत सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, ॲड. निरंजन डावखरे यांनी सहभाग घेतला. त्यास उत्तर देताना सरनाईक म्हणाले की, अलीकडे घडलेल्या दोन भीषण अपघातांमध्ये अनुक्रमे १३ आणि ११ जणांचा मृत्यू झाला आहे. या दोन्ही घटनांमध्ये अवैध प्रवासी वाहतूक हेच प्रमुख कारण होते. या प्रकरणांमध्ये वाहनचालकांसह संबंधित वाहनमालकांवरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संबंधित मालवाहू वाहनाचा परवानाही रद्द करण्यात आला आहे.

अपघातग्रस्तांच्या कुटुंबीयांना शासनाकडून प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली होती. आवश्यक कार्यवाही नंतर मदत वितरित करण्यात येणार आहे.ग्रामीण व दुर्गम भागात प्रवाशांना अधिकृत वाहतूक सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी १०० मिनी बसेसही ताफ्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच लवकरच राज्याचे नवीन ॲग्रिगेटर धोरण जाहीर करण्यात येणार आहे. त्याद्वारे छोट्या वाहनांना कायदेशीर चौकटीत प्रवासी वाहतुकीत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.



अधिकारी बेकायदेशीररीत्या प्रवासी वाहतूक कारवाईत हलगर्जीपणा करत असल्यास त्यांच्याविरुद्धही कठोर कारवाई केली जाईल. याशिवाय, ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांना लग्नसराईसारख्या प्रसंगी माफक दरात एसटी बसेस उपलब्ध करून देण्याची अभिनव योजना राबविण्याचा विचार शासन करत असल्याचे मंत्री सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

**व्यापक रस्ता सुरक्षा आराखडा तयार**

अपघातप्रवण ठिकाणांचा अभ्यास करून व्यापक रस्ता सुरक्षा आराखडा तयार करण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या सहकार्याने त्याची लवकरच अंमलबजावणी केली जाणार आहे.

# शाळेत रडते म्हणून पोटच्या पोरीला केली लाथेनी मारहाण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** नव्यानेच अंगणवाडी जाणारी अडीच वर्षाची चिमुरडी ही शाळेत रडते म्हणून रागाच्या भरात पोटच्या पोरीला लाथेने मारहाण केल्याची घटना पनवेल तालुक्यातील नांदगाव परिसरात घडली असून या संदर्भात सोशल मिडीयावर व्हिडीओ व्हायरल होताच अनेकांनी संताप व्यक्त करून सदर मातेवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल तालुक्यातील नांदगाव येथे ही घटना घडली आहे. शाळेत गेल्या सहा दिवसापासून ही अडीच वर्षाची चिमुरडी जात होती. परंतु शाळेमध्ये तिचे मन लागत नव्हते त्यामुळे ती सतत रडायची, अशाच प्रकारे काल सुद्धा तीची आई तिला सोडण्यास गेली असताना ती रडायला लागल्याने अंगणवाडीच्या दरवाजात तिने आपल्या मुलीला लाथेने मारले व हा व्हिडीओ प्रसारमाध्यमांवर



व सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. याची दखल पोलीस खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतली व तातडीने सदर मुलीच्या कुटुंबियांना पोलीस ठाण्यात आणून त्या मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर सदर मुलीला तिच्या आईसह सध्या शासनाच्या बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले आहे. या घटनेमुळे पालक वर्गामध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

# धानसर गावातील मुख्य रस्त्याच्या डागडुजीच्या कामास प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या आदेशानुसार धानसर गावातील मुख्य रस्त्याच्या डागडुजीच्या कामास शुभारंभ करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका लीना नंदकुमार



म्हात्रे, विजयश्री संतोष पाटील, . नगरसेवक नितेश पाटील, ओबीसी सेलचे तालुका अध्यक्ष माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे, संतोषबुवा पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश पोरजी आणि प्रभाग क्र. १ चे सरचिटणीस जितेंद्र पोरजी यांच्या विशेष प्रयत्नांमुळे ग्रामस्थांची दीर्घकाळची मागणी पूर्ण होत असून रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. रस्त्याच्या डागडुजीमुळे धानसर गावातील नागरिकांना सुरक्षित व सुकर वाहतुकीची सुविधा उपलब्ध होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# कोकण भवन येथे सामाजिक न्याय दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** लोकराजा राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रादेशिक उपायुक्त कार्यालय समाज कल्याण कोकण भवन बेलापूर येथे सामाजिक न्याय दिन म्हणून मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागातर्फे 26 जून हा दिवस सामाजिक न्याय दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. श्री बाळासाहेब सोळंकी ,प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात राजश्री छत्रपती शाहू महाराज यांना आदरांजली



वाहण्यात आली. तसेच हा दिवस जागतिक अमली पदार्थ विरोधी म्हणून सुद्धा साजरा केला जातो. त्यानिमित्ताने उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळेला अधिकारी व कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# ईपीआर फाउंडेशन, भावना ग्रुपतर्फे योगा दिवस साजरा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : ईपीआर फाउंडेशन, भावना ग्रुप यांच्यातर्फे रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल येथे मोठ्या उत्साहात योगा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी ईपीआर फाउंडेशनच्या संस्थापक अपर्णा शहा, डॉ. गिरीश गुणे, नगरसेवक गणेश कडू, नगरसेविका दर्शना भोईर, डॉ. कैलास जवाडे (गॅस्ट्रोलॉजिस्ट), मनसे महिला जिल्हाध्यक्ष आदिती सोनार, एड. मनोहर सचदेव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

21 जून आंतरराष्ट्रीय योग दिवस, संपूर्ण विश्वामध्ये योग दिवस साजरा केला जातो. या



कार्यक्रमांमध्ये अनेक योगसाधक उपस्थित होते. त्यांना मार्गदर्शन करण्यास पराग (अलाईन योगा), जागृती माने ( हॉलिस्टिक एनर्जी हीलर आणि स्प्रिच्युअल गाईड) लाभले. योग आसनांद्वारे, मेडिटेशन, मेंटल हेल्थ, अशा अनेक स्वरूपामध्ये हा सोहळा रंगला. याकार्यक्रमाला मॅनेजिंग डायरेक्टर भावना ग्रुप राजेश शहा यांनी देखील आपली उपस्थिती दर्शवली. यावेळी कार्यक्रमाला उपस्थित पाहुण्यांनी योग साधना मानवी आयुष्यात किती महत्त्वाची आहे, याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

ईपीआर फाउंडेशनच्या संस्थापक अपर्णा शहा यांनी खा-खेळा-वाचा अभियान भारताला निरोगी आणि आनंददायी राष्ट्र बनवणे हा उद्देश घेऊन कार्यरत आहे. खा विचारपूर्वक, खेळा उत्साहपूर्वक, वाचा उत्स्फूर्तपणे या सवयी अंगीकारून योग साधना जीवनामध्ये कशी ऊर्जा निर्माण करते, उत्साह निर्माण करते, विवेक जागृत करते, खा-खेळा-वाचा हे अभियान देखील याच कार्यातील एक अंग आहे. योग आणि खा-खेळा-वाचा अभियान या दोघांच्या साथीने जीवन हे परिपूर्ण जीवन कसं बनेल हे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेकांना योग साधनेबद्दल नवनवीन माहिती आणि योगाचे जीवनातील महत्त्व कळाले.

# कर्तव्य, निष्ठा आणि समर्पणाचा गौरव!

## दैनिक युवक आधारच्या मुंबई विभागीय संपादकपदी किशोर रमाकांत गुडेकर यांची पदोन्नत

**दैनिक युवक आधार**

**संपादक :** दैनिक युवक आधारच्या यशस्वी वाटचालीत गेल्या तीन वर्षांपासून निःस्वार्थ, सातत्यपूर्ण आणि समर्पित योगदान देणारे मुंबई प्रतिनिधी प्रमुख श्री. किशोर रमाकांत गुडेकर यांची त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मुंबई विभागीय संपादक या जबाबदारीच्या पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. ही पदोन्नती केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, प्रामाणिक कार्य, निष्ठा, त्याग आणि संघटनेप्रती असलेल्या समर्पणाचा गौरव आहे.

श्री. गुडेकर यांनी गेल्या तीन वर्षांत दैनिक युवक आधारच्या प्रत्येक उपक्रमात स्वतःहून पुढाकार घेतला. दैनिक युवक आधारच्या







प्रत्येक वर्धापन दिनानिमित्त त्यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता आर्थिक सहकार्य केले. संस्थेला जेव्हा गरज भासली तेव्हा ते सर्वप्रथम मदतीसाठी पुढे उभे राहिले. त्यांच्या या योगदानामुळे संस्थेची आर्थिक बाजू अधिक भक्कम होण्यास मोलाची मदत झाली.

याचबरोबर त्यांनी दैनिक युवक आधारसाठी विविध जाहिराती मिळवून देणे, नवीन प्रतिनिधी जोडणे, त्यांना संस्थेशी जोडून ठेवणे आणि संघटन अधिक मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. पत्रकारितेची गुणवत्ता वाढावी यासाठी ते विविध पत्रकार प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा, परिषद आणि कॉन्फरन्समध्ये नियमित सहभागी होत राहिले. शिकण्याची जिद्द, स्वतःला सतत अद्ययावत ठेवण्याची वृत्ती आणि मिळालेले ज्ञान इतर प्रतिनिधींनाही देण्याचा त्यांचा प्रयत्न नेहमीच कौतुकास्पद राहिला आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक नवीन प्रतिनिधींना योग्य दिशा मिळाली. शांत स्वभाव, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची पद्धत, संघभावना आणि संस्थेच्या हिताला नेहमीच प्राधान्य देण्याची त्यांची भूमिका यामुळे त्यांनी संपूर्ण दैनिक युवक आधार परिवारात "आदर्श प्रतिनिधी" म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आज त्यांच्या पदोन्नतीचा आनंद हा केवळ त्यांचा वैयक्तिक आनंद नसून, प्रत्येक प्रामाणिक आणि मेहनती प्रतिनिधीच्या कार्याचा सन्मान आहे. दैनिक युवक आधारमध्ये पद हे कोणालाही सहज मिळत नाही; ते निष्ठा, कार्यक्षमता, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण योगदानाच्या जोरावर मिळते, याचे श्री. किशोर रमाकांत गुडेकर हे जिवंत उदाहरण आहेत.

**दैनिक युवक आधारच्या सर्व प्रतिनिधींना या निमित्ताने एकच संदेश आहे —**

संस्थेवर प्रेम करा, प्रामाणिकपणे काम करा, शिकण्याची वृत्ती जपा, एकमेकांना साथ द्या आणि दैनिक युवक आधारला स्वतःची संस्था समजून तिच्या प्रगतीसाठी योगदान द्या. तुमच्या कार्याची दखल निश्चितच घेतली जाईल.

## रा.जि.प.शाळा नवीन शेवे येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिन उत्साहात साजरा!



**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : येथील रायगड जिल्हा परिषद शाळा, नवीन शेवे येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती आणि 'सामाजिक न्याय दिन' अत्यंत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून राजश्री छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन केले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका मोहिनी पाटील मॅडम यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. मच्छिंद्र म्हात्रे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक आणि सामाजिक चळवळीची माहिती दिली. इयत्ता पहिली ते सातवीतील विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर अभ्यासपूर्ण भाषणे आणि सुंदर मनोगत व्यक्त केले.

मच्छिंद्रनाथ म्हात्रे आणि प्रवीण म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाहू महाराजांचे विचार आजच्या काळात कसे महत्त्वाचे आहेत, हे पटवून दिले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सुंदर व्हिडिओ आणि फोटो चैताली म्हात्रे यांनी आपल्या कॅमेऱ्यात अचूक टिपले. कार्यक्रमाची सांगता शर्मिला गावंड यांनी मानलेल्या आभार प्रदर्शनाने झाली.

या सोहळ्यामुळे रा. जि. प. शाळा नवीन शेवे येथील वातावरण अतिशय प्रेरणादायी बनले होते. सर्व शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# उपद्रवी लोकांमुळे देशाची नाचक्की झालेला प्रकार म्हणजे पूर्वनियोजित षडयंत्र

## अरिहंत डेव्हलपर्सचे अशोक छाजेड यांची स्पष्टोक्ती

**दैनिक युवक आधार**

**सोनल नलावडे** : सुप्रसिद्ध विकसक अरिहंत डेव्हलपर्सचे संचालक अशोक छाजेड यांनी त्यांच्याविरुद्ध वायरल होत असलेल्या व्हिडिओचे बाबत आपली भूमिका मांडताना स्पष्ट केले आहे की हा सगळा प्रकार म्हणजे पूर्वनियोजित षडयंत्र असून त्या पाठीमागे पाण्याची समस्या सोडवण्याची सजग वृत्ती दिसून येत नाही. सदर व्हिडिओ खरा असून त्या पाठीमागील पार्श्वभूमी आणि उपद्रव निर्माण करणाऱ्या व्यक्तींचे वास्तव जाणून घेण्याच्या उद्देशाने त्यांनी माध्यमांसमोर आपली भूमिका मांडली आहे.



खारघर येथील अरिहंत डेव्हलपर्स यांनी विकसित केलेल्या अरिहंत आलिशान या संकुलामध्ये आजमितीला ३८० कुटुंबे राहतात परंतु हा व्हिडिओ बनविण्याच्या उद्देशाने उपद्रव निर्माण करणाऱ्या केवळ १५ ते २० व्यक्ती सदर व्हिडिओ मध्ये दिसतात. सदर घटना ही संपूर्णपणे पूर्वनियोजित होती. अशोक छाजेड हे येथील क्लब हाऊस मध्ये NAREDCO NMR रायगड यांच्या वतीने आयोजित एका चर्चासत्र कार्यक्रमाचे करता आले होते. विशेष उल्लेखनीय म्हणजे या कार्यक्रमात परदेशातून आलेल्या काही पाहुण्यांसोबत त्यांची अत्यंत महत्त्वाची चर्चा सुरू होती. पाण्याच्या समस्या संदर्भात काही लोक भेटू इच्छित आहेत असे समजल्यावर हे चर्चासत्र अत्यंत महत्त्वाचे असून त्यांची समस्या निराकारण करण्याकरता मी संध्याकाळी सहा नंतर नक्की भेटेन असा निरोप अशोक छाजेड यांनी पाठविला. आलेली परदेशी पाहुणे मंडळी या क्षेत्रातील तज्ञ असून त्यांनी इथे उपस्थित राहणे हा आपल्या देशाच्या दृष्टीने सन्मानाचा भाग आहे त्यामुळे त्यांच्या समावेत नियोजित केलेले चर्चासत्र पूर्ण होऊ दे! मग मी अवश्य तुमची भेट घेतो असे देखील छाजेड यांनी कळविले.

या पार्श्वभूमीवर आलेल्या मंडळींना केवळ उपद्रव निर्माण करून या चर्चासत्रामध्ये विघ्न आणायचे होते. या मंडळींना समस्या केंद्रित चर्चा करायची नसून केवळ हैदोस घालणं हा एकमेव त्यांचा उद्देश होता. त्यांचा पूर्वग्रहदोषित डाव लक्षात आल्याने अशोक छाजेड यांनी अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम अर्धवट टाकून तेथून निघून जाणे पसंत केले.या लोकांनी अशोक छाजेड यांचीच गाडी अडविली नाही तर त्यांनी परदेशी पाहुण्यांच्या गाड्या देखील अडवून ठेवल्या. झाल्या प्रकाराने परदेशी पाहुणे भयभीत झाले आणि रिक्षा पकडून कार्यक्रम स्थळाहून निघून गेले.

उपद्रव निर्माण करणाऱ्या लोकांच्या बाबत पुढे स्पष्टीकरण देताना अशोक छाजेड म्हणाले की एक विकसक म्हणून अरिहंत आलिशानमधील प्रत्येक घरात नळ जोडणी आम्ही करून दिलेली आहे. मुबलक पाणीपुरवठा करणं ही पनवेल महानगरपालिकेची जबाबदारी आहे. पावसाला विलंब झाल्यामुळे संपूर्ण महानगरपालिका क्षेत्राला पाण्याच्या दुर्भिक्ष जाणवत आहे. अशा परिस्थितीत देखील टँकरच्या माध्यमातून अरिहंत आलिशान या संकुलाला पाणीपुरवठा करण्याचा आमचा प्रयत्न असतो. अरिहंत आलिशान या ठिकाणी एसटीपी प्लांट आणि आरओ प्लांट यापूर्वीच कार्यान्वित झालेले आहेत.

नियोजित षडयंत्रातून अरिहंत डेव्हलपर्स आणि परदेशी पाहुण्यांच्या चर्चासत्राला बदनाम करण्याच्या प्रयत्नामुळे देशाच्या सन्मानाला देखील धक्का लागलेला आहे. अशोक छाजेड अखेरीस म्हणाले की ज्या प्रकारे शेतकरी मेहनत करून समाजाच्या पोटाची भूक मिटवत असतात त्याचप्रकारे विकासक देखील मेहनत करून अन्न वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांपैकी निवारा देत सामाजिक कार्य करत असतात याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे.

# २५ जून : 'आणीबाणीचा काळा दिवस' कळंबोली मंडळात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : देशावर लादण्यात आलेल्या आणीबाणीच्या ५१ व्या वर्षानिमित्त भारतीय जनता पार्टी, कळंबोली मंडळाच्या वतीने २५ जून हा दिवस 'आणीबाणीचा काळा दिवस' म्हणून गांभीर्यपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे संयोजक भाजप भटके-विमुक्त मोर्चाचे जिल्हाध्यक्ष श्री. बबन बारगजे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आणीबाणीच्या काळात लोकशाहीवर आलेले संकट, संविधानिक मूल्यांचे झालेले उल्लंघन, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आलेली गदा आणि त्या काळातील अन्याय-अत्याचार याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच



लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या लोकशाहीवादी नेत्यांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

यावेळी कळंबोली मंडळ अध्यक्ष श्री. अमर अरुण पाटील यांनीही आणीबाणीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर उपस्थितांना मार्गदर्शन करत लोकशाही मूल्यांचे जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमास मंडळ सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, नगरसेविका मोनिका महानवर, बायजा बबन बारगजे, दमयंती भोईर, नगरसेवक राजेंद्र शर्मा तसेच मंडळातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी लोकशाही, संविधान आणि देशाच्या लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी सदैव कटिबद्ध राहण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## परतूर रेल्वे स्टेशनवर मोटारसायकल आणाल तर होणार कारवाई

# आरपीएफ अधिकारी विजय वाघ यांचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : 26 जून 2026 परतूर रेल्वे स्टेशन परिसरात मोटारसायकल घेऊन येणाऱ्या प्रवाशांवर आता थेट कारवाई होणार आहे. रेल्वे सुरक्षा दलाचे (आरपीएफ) अधिकारी विजय वाघ यांनी आज स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे.

रेल्वे स्टेशन हा सार्वजनिक ठिकाण असून प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आहे. प्लॅटफॉर्मवर किंवा स्टेशन परिसरात विनापरवाना मोटारसायकल आणणे हा नियमभंग आहे. गर्दीच्या वेळी अपघाताचा धोका वाढतो आणि इतर प्रवाशांना अडथळा निर्माण होतो. त्यामुळे यापुढे मोटारसायकल आणल्यास दंडात्मक व कायदेशीर कार्यवाहीला सामोरे जावे लागेल,असे विजय वाघ यांनी सांगितले.



ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना चालण्यास अडचण निर्माण होत होती. रेल्वे मालमत्तेचे नुकसान होण्याच्या घटनाही घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**कारवाई कशी होणार?**

1. पहिल्यांदा सूचना व समज देण्यात येईल.
2. नियम मोडल्यास रेल्वे कायद्यान्वये दंड आकारला जाईल.
3. वारंवार गुन्हा केल्यास मोटारसायकल जप्त करून 147,154,153 या या कलमानुसार कायदेशीर कार्यवाहीदोन वर्ष किंव्हा दोन हजार रुपये दंड, पाच वर्ष सज्जा होऊ शकते.

आर.पी.एफ.ने प्रवाशांना आवाहन केले आहे की, स्टेशनपासून 100 मीटर अंतरावर असलेल्या पार्किंग मधेच वाहने पार्क करावीत. रेल्वे प्रशासनाने दुचाकींसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था केली असून तिचाच वापर करावा. प्रवाशांची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे. नियम पाळा, सहकार्य करा, असे आवाहन विजय वाघ यांनी शेवटी केले. परतूर रेल्वे स्टेशनवर सध्याआर.पी.एफ.कडून जनजागृती मोहीमही राबवली जात आहे. यावेळी लोहमार्ग हवालदार कैलास वाघ, कॉन्स्टेबल कृष्णा खरात व आरपीएफ च्या महिला कॉन्स्टेबल गुड्डी कुमारी मीना व पत्रकार शिवकुमार भारुका उपस्थित होते.

## तळा हायस्कूलमध्ये छत्रपती संभाजी महाराज व राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी!

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी** : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो. म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, तळा येथे छत्रपती संभाजी महाराज व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची संयुक्त जयंती नुकतीच अत्यंत उत्साही आणि भारावलेल्या वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून दोन्ही युगपुरुषांच्या महान कार्याला उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री. महादेव लोकरे यांनी भूषविले, तर पर्यवेक्षिका सौ. जयश्री मचे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन



करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना श्री. रोहित भागवत, प्रा कसबे पी. पी., प्रा सर्जे व्ही. बी. व मुख्याध्यापक श्री. महादेव लोकरे यांनी दोन्ही छत्रपतींच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. छत्रपती संभाजी महाराजांचे स्वराज्य रक्षण, त्यांचे अजोड शौर्य आणि राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजासाठी घेतलेले क्रांतिकारी निर्णय, शैक्षणिक व सामाजिक सुधारणा याविषयी वक्त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आजच्या तरुण पिढीने या दोन्ही महापुरुषांचे विचार आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.

या संपूर्ण सोहळ्याचे सूत्रसंचालन श्री. रोहित भागवत यांनी केले. कार्यक्रमाला गो. म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# शाळा दत्तक योजनेतून वाहतूक शिस्तीचे संस्कार

## खारघर वाहतूक शाखेच्या पोलिसांचा आय टी एम स्किल डेव्हलपमेंट कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले** : श्री. राहुल खाडे, पोलीस उपआयुक्त (वाहतूक), नवी मुंबई यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या 'शाळा दत्तक योजना २०२६–२०२७' अंतर्गत खारघर वाहतूक शाखेच्या वतीने के.एल.ई. कॉलेज, खारघर येथे वाहतूक जनजागृती व प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी व शिक्षकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

नवी मुंबई वाहतूक विभागाने वाहतूक नियमांचे प्रभावी प्रबोधन करण्यासाठी 'शाळा दत्तक योजना' सुरू केली असून, खारघर वाहतूक शाखेच्या हद्दीत एकूण ३० शाळा व महाविद्यालयांचा समावेश आहे. प्रत्येक शाळा व महाविद्यालय



एका वाहतूक अंमलदाराकडे दत्तक देण्यात आले असून, संबंधित अधिकारी नियमितपणे विद्यार्थ्यांशी संवाद साधून वाहतूक शिस्तीचे महत्त्व पटवून देत आहेत.

या उपक्रमाअंतर्गत गुरुवार, दि. २५ जून २०२६ रोजी खारघर वाहतूक शाखेचे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सतीश शिदोरे, पोलीस हवालदार सतीश पवार व महिला पोलीस नाईक धायगुडे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली के.एल.ई. कॉलेजला भेट दिली.

यावेळी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा, झेब्रा क्रॉसिंगचा योग्य वापर, वाहतूक सिग्नलचे पालन, दुचाकीस्वारांसाठी हेल्मेटचा वापर, चारचाकीतील सीटबेल्टचे महत्त्व, वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर टाळणे तसेच सायकलस्वार व पादचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सतीश शिदोरे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, "वाहतूक नियमांबाबत कोणतीही अडचण, शंका किंवा सूचना असल्यास निःसंकोचपणे मांडाव्यात. तुम्हीच उद्याचे जबाबदार नागरिक आहात आणि सुरक्षित वाहतुकीसाठी तुमचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे."

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमास के.एल.ई. कॉलेजचे श्री. समाधान पाटील (प्रशासन विभाग), डॉ. जास्मिन झा (शैक्षणिक प्रशासन), डॉ. उमा हांजीगे (प्राध्यापक) आणि डॉ. अर्पिता पांडे (प्राध्यापक) यांच्यासह शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## भारतीय जनता युवा मोर्चा, उत्तर अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष पदी कुणाल बोरुडे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**नेवासा वार्ताहर** : नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव येथील युवा कार्यकर्ते कुणाल बोरुडे यांची भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड झाली. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांच्या कामातून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.भारतीय जनता पार्टी पक्ष निष्ठ म्हणुन त्यांनी ओळख निर्माण केली. तरुणांचे मोठे संघटन त्यांनी उभे केले.शिर्डी लोकसभा जिल्हाध्यक्ष



रोहित चौधरी यांनी जाहीर केली आहे. या अगोदर कुणाल बोरुडे आणि भाजपच्या अनेक पदावर काम केलेले आहे.या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे धर्मरक्षक गणेश चौगुले यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त पनवेल दगडी शाळा येथे वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांना छत्री व वह्यावाटप कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त पनवेल शहर शिवसेनेतर्फे पनवेल म.न.पा. दगडी शाळा क्रं २ येथे वृक्षारोपण तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोफत छत्री व वह्या वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना सल्लागार रमेश गुडेकर यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वह्यांचे तर शिवसेना समन्वयक राहुल गोगटे यांच्या माध्यमातून छत्रीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेनेचे राहुल गोगटे यांनी केले होते.

यावेळी शिवसेना जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, नगरसेवक,महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, शहरप्रमुख प्रसाद सोनवणे, शहर संघटक अभिजित साखरे, उपशहर



प्रमुख शैलेश जगनाडे, अर्जुन परदेशी, शहर उपसंघटक खंडेश धनावडे,शाखा प्रमुख गुलाब बागवान,विक्रम पाटणकर,जेष्ठ शिवसैनिक सुजन मुसलोंडकर,आयोजक शिवसेना समन्वयक राहुल गोगटे,तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुजित म्हात्रे,शिक्षक वैभव पाटील, वैशाली सावळे, अर्चना माने,स्वाती पाटील आदींचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाप्रसंगी बोलताना नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी राहुल गोगटे यांच्या आयोजनाचे कौतुक केले तसेच गोगटे हे कुठल्याही पदाची, नावाची अपेक्षा न ठेवता दरवर्षी हा कार्यक्रम करत असतात, त्यामुळे निश्चितच गरजू विद्यार्थ्यांना याचा लाभ होतो, शिवसेनेच्या ८०% समाजकारण २०% राजकारण या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे तसेच पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अपेक्षित कार्य या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.यावेळी बोलताना शिवसेना जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर व शिक्षकवृंद यांनी देखील राहुल गोगटे यांच्या कामाचे कौतुक करून यापुढे देखील असेच सहकार्य शाळेस करण्याचे आवाहन केले

**जाहीर नोटिस**

नमुना एन डी
(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. 5606/PNL/99 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46C1520 रिक्षा आणि MH46BL1770 2 व्हिलर, MH06AG9505 टेम्पो चे मालक कै.सुनिल गोविंद भोपी याचं दिनांक 11/04/2026 रोजी निधन झाले आहे.

मी
वनिता सुनिल भोपी गाव चिंचपाडा,
पोस्ट -पारगाव ता-पनवेल, रायगड, महाराष्ट्र, -410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**वनिता सुनिल भोपी .**
**चिंचपाडा, पोस्ट -पारगाव ता-पनवेल,**
**रायगड,महाराष्ट्र,410206.**

# अस्वच्छ टपऱ्या कॅन्टीग्स वर स्वत: येऊन कारवाई करा; दैनिक युवक आधार आणि महाराष्ट्र सुपरफास्ट न्यूजचे अन्न व औषध प्रशासनाला थेट आव्हान !!

## रायगड अन्न व औषध प्रशासन विभागाचा कारभार रामभरोसे; १५ तालुक्यांसाठी केवळ ९ अधिकारी, कर्मचाऱ्यांचा खडखडाट !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर** : रायगड जिल्ह्यातील अन्न आणि औषधी सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असून, संपूर्ण जिल्ह्याचा कारभार सध्या अपुऱ्या मनुष्यबळा अभावी रामभरोसे चालल्याचे समोर आले आहे. दैनिक युवक आधार आणि 'महाराष्ट्र सुपरफास्ट न्यूज चॅनेल'च्या वरिष्ठ प्रतिनिधींनी गुरुवार, दिनांक २५ जून रोजी पेण येथील अन्न व औषध प्रशासन (F.D.A) कार्यालयाला थेट भेट देऊन येथील गंभीर परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला.




या महत्त्वपूर्ण पाहणी दौऱ्यावेळी महाराष्ट्र सुपरफास्ट न्यूज चॅनेलचे सचिव व पेण प्रतिनिधी धनाजी घरत, दैनिक युवक आधारचे जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर,सुपरफास्ट चॅनेलच्या कार्यकारी संपादिका व निवेदिका तृप्ती भोईर आणि 'युवक आधार'चे प्रतिनिधी उमाकांत पानसरे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे वरिष्ठ अधिकारी माननीय तुकाराम मुंडे साहेबांनी शासकीय कामात पारदर्शकता, शिस्त आणि गती आणण्यासाठी एक अत्यंत कडक परिपत्रक काढले आहे. बेकायदेशीर धंदे आणि भेसळीवर तात्काळ कडक कारवाई करण्याचे आदेश यात आहेत. मात्र, रायगड जिल्ह्यातील कार्यालयात काम करण्यासाठी कर्मचारीच शिल्लक नसल्याने या परिपत्रकाची अंमलबजावणी कशी करावी, या विवंचनेत अधिकारी सापडले आहेत. कर्मचाऱ्यांअभावी या विभागात सध्या मोठी बोंबाबोंब सुरू आहे.

रायगड जिल्हा रायगड जिल्ह्यात १५ तालुके आहेत, आणि नियमानुसार या ठिकाणी ७ मुख्य पदे आणि २ असिस्टंट आयुक्त असायला हवेत. मात्र प्रत्यक्षात केवळ ३ मुख्य अधिकारी कार्यरत आहेत. संपूर्ण जिल्ह्यात केवळ ९ अधिकारी काम पाहत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करण्यासाठी लिपिक किंवा शिपाई उपलब्ध नाही त्यामुळे नोटीसा काढणे, माहिती पुढे पाठवणे यासारखी सर्व कागदपत्रांची कामे काही वेळा स्वतः अधिकाऱ्यांनाच करावी लागत आहेत.

या चर्चेदरम्यान उपस्थित प्रतिनिधींनी रायगड जिल्ह्यातील विदारक परिस्थिती अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले अनेक ठिकाणी अत्यंत घाणेरड्या आणि अस्वच्छ वातावरणात खाद्यपदार्थांची विक्री केली जाते प्रतिनिधींनी सहाय्यक आयुक्तांना थेट सांगितले की तुम्ही स्वतः कधीही येऊन कोणत्याही अशा घाणेरड्या ठिकाणी असलेल्या किंवा नियमबाह्य चालणाऱ्या टपऱ्या कॅन्टींगला अचानक भेट द्या तिथे नागरिकांच्या आरोग्याशी कसा खेळ सुरू आहे हे उघड होईल अशावेळी त्या ठिकाणी असलेल्या हॉटेल आणि टपऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाने तात्काळ धडक कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे.या सर्व अडचणींवर बोलताना सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन रायगड माननीय मिलिंद महागडे यांनी चॅनेल शी बोलताना विभागाच्या कारवाईची आकडेवारी मांडली एकूण तपासणी १८४,अन्न नमुने १३८,सर्विस लेन्स ९४ प्रकरणे, दंडात्मक कारवाई ३८५ प्रकरणांमध्ये एकूण २ लाख ६४हजार रुपयांचा दंड शासनाकडे जमा झाला असून गुटखा व पान मसाला कारवाई मध्ये ३० प्रकरणांमध्ये २ लाख ७५ हजार रुपयांचा अवैध साठा जप्त केला आहे तर दुग्धजन्य पदार्थ ५ प्रकरणांमध्ये कारवाई करत ५५ हजार ४५६ रुपयाचा साठा जप्त.

या भेटीदरम्यान अधिकाऱ्यांनी एक कौतुकास्पद पाऊल उचलले. मनुष्यबळ कमी असले तरी नागरिकांच्या तक्रारीवर तात्काळ ॲक्शन घेतली जाईल अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली. अशा प्रकारचे कॅन्टींग , टपऱ्या किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थ कुठेही आढळल्यास नागरिकांनी थेट संपर्क साधावा. याकरता अधिकाऱ्यांनी स्वतःचे वैयक्तिक मोबाईल नंबर आणि अधिकृत ईमेल आयडी चॅनेल च्या प्रतिनिधींकडे सुपूर्त केले आहेत. नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता थेट कार्यालयाशी संपर्क साधून तक्रार नोंदवावी. असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत स्वस्तिका घोषची दमदार कामगिरी; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून स्वस्तिका घोषचे अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : भारतीय महिला टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा उल्लेखनीय कामगिरी करत भारताचा गौरव वाढवला आहे. ओवेरियन सिस्ट शस्त्रक्रियेनंतर तब्बल तीन महिन्यांच्या विश्रांतीनंतर तिने केलेले हे पुनरागमन अत्यंत प्रेरणादायी ठरले आहे. श्री. संदीप घोष यांची कन्या आणि १९५० च्या दशकातील नामवंत फुटबॉलपटू स्वर्गीय निर्मल घोष यांची नात असलेल्या स्वस्तिकाने फ्रान्समध्ये झालेल्या डब्ल्यूटीटी फीडर हेनेबॉ (WTT Feeder Hennebont) २०२६ स्पर्धेत शानदार पुनरागमन करत आपल्या जिद्दीचा आणि कौशल्याचा प्रत्यय दिला. या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिका घोषचे अभिनंदन करून तिला पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी तिचे वडील व प्रशिक्षक संदीप घोष, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक आदी उपस्थित होते.



स्पर्धेतील महिला दुहेरी गटात स्वस्तिकाने भारताच्या तनिषा कोटेचा हिच्यासह जोडी जमवत रौप्यपदक पटकावले. अंतिम फेरीपूर्वी भारतीय जोडीने फ्रान्स आणि स्वित्झर्लंडच्या मजबूत जोड्यांचा प्रत्येकी ३-० अशा सरळ सेटमध्ये पराभव करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात त्यांना अनुभवी जपानी जोडीकडून पराभव स्वीकारावा लागला आणि रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. यापूर्वी, शस्त्रक्रियेपूर्वी स्वस्तिकाने लक्झेंबर्गच्या साराह दे नुट्टे हिच्यासोबत डब्ल्यूटीटी स्टार कंटेंडर चेन्नई २०२६ स्पर्धेच्या महिला दुहेरीत उपांत्य फेरी गाठली होती. महिला एकेरी गटातही स्वस्तिकाने उत्कृष्ट खेळ करत कांस्यपदक जिंकले. बाद फेरीत तिने जर्मनीच्या सोफिया हिचा ३-२, तर युआन हिचा ३-१ असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमच्या खेळाडूवर ३-१ अशी मात करत ती उपांत्य फेरीत पोहोचली. मात्र सलग सामन्यांमुळे आलेल्या थकव्याचा परिणाम झाल्याने उपांत्य फेरीत तिला चायनीज तैपेईच्या बलाढ्य खेळाडूकडून पराभव पत्करावा लागला. स्वस्तिकाने यावर्षी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही स्तरांवर सातत्यपूर्ण यश संपादन केले आहे. तिने भारतातील महिला क्रमवारीत दुसरे स्थान मिळवले असून पंचकुला राष्ट्रीय क्रमवारी स्पर्धेचे महिला एकेरी विजेतेपदही पटकावले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर तिने भारताचे प्रतिनिधित्व करत एशियन टेबल टेनिस चॅम्पियनशिप, आयटीटीएफ मिक्स्ड टीम वर्ल्ड कप, एशियन कप तसेच विविध डब्ल्यूटीटी स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. फ्रान्समधील या स्पर्धेतील उत्कृष्ट प्रदर्शनामुळे तिच्या जागतिक क्रमवारीतही मोठी सुधारणा झाली असून ती आता जागतिक क्रमवारीत १३२व्या स्थानावर पोहोचली आहे. शस्त्रक्रियेपूर्वीही स्वस्तिकाने अनेक महत्त्वपूर्ण यश संपादन केले होते. तिने पंचकुला राष्ट्रीय क्रमवारी स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले, तसेच मार्च महिन्यात झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड संघाकडून खेळताना पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड अंतर्गत सांघिक गटात रौप्यपदक जिंकले. या उल्लेखनीय पुनरागमनानंतर स्वस्तिकाची २७ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ दरम्यान नवी दिल्ली येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय महिला संघात निवड झाली आहे. शस्त्रक्रियेनंतर अवघ्या तीन महिन्यांत आंतरराष्ट्रीय स्तरावर दोन पदके जिंकत स्वस्तिका घोषने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीचा उत्कृष्ट नमुना सादर केला आहे. तिचे हे यश देशातील युवा खेळाडूंना निश्चितच प्रेरणादायी ठरणारे असून आगामी काळात तिच्याकडून आणखी मोठ्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**स्वस्तिका घोषच्या यशामागे खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा मोलाचा वाटा**

भारतीय महिला टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. ती सीकेटी महाविद्यालयात एम.ए. (इंग्रजी) शाखेची विद्यार्थिनी असून, शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात उभारण्यात आलेले हाय-परफॉर्मन्स टेबल टेनिस प्रॅक्टिस सेंटर हे स्वस्तिकाच्या यशातील महत्त्वाचे आधारस्थान ठरले आहे. या अत्याधुनिक सराव केंद्रात जागतिक दर्जाच्या सुविधा, आधुनिक टेबल टेनिस उपकरणे आणि उच्चस्तरीय प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेले वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. या केंद्रात स्वस्तिका घोष सातत्याने सराव करत असून, स्वस्तिकाच्या यशामागे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा पाठिंबा आणि तिचे वडील आणि प्रशिक्षक संदीप घोष यांचे मोलाचे मार्गदर्शन व अथक परिश्रम आहेत. त्यांच्या कुशल प्रशिक्षणामुळे स्वस्तिकाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण यश मिळवले आहे.

# "श्री स्वामी समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था आमखेडा ची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न"

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : शहरातली व तालुक्यातील श्री स्वामी समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, आमखेडा यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात करण्यात आले. दीपप्रज्वलन व श्री स्वामी समर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून सभेला प्रारंभ झाला.या सभेसाठी गोंदिया येथील जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र,सोयगाव शाखेचे व्यवस्थापक धीरज भुरे, तेजस्विनी काळे,डॉ.मलहान पटेल, आमखेडा ग्रामपंचायत प्रशासक नंदा आगे,माजी सरपंच गजानन ढगे,पत्रकार दिलीप शिंदे,विजय काळे,सुलेमान शेख, योगेश बोखारे उबाठा तालुकाप्रमुख दिलीप मचे, निंबायतीचे सरपंच राजू पाटील,माजी सरपंच धनसिंग राठोड, कंकराळा सोसायटीचे माजी सभापती रवींद्र पाटील,गलवाडाच्या माजी सरपंच सुरेखा तायडे,खरेदी-विक्री संघाचे व्यवस्थापक बन्सीलाल बेडवाल,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे




रमेश जाधव, निवृत्त कर्मचारी प्रदीप रोकडे, कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे व्यवस्थापक गोतमारे अप्पा व कर्मचारी,भैरवनाथ पतसंस्थेचे व्यवस्थापक गोविंदा औरंगे व कर्मचारी, तिरुपती अर्बन बँकेचे व्यवस्थापक विकास देसाई व कर्मचारी,सामाजिक कार्यकर्त्या व संस्था संस्थापक संचालिका विमलबाई निकम,जरंडीचे मुख्याध्यापक देविदास पाटील, शआमखेडा पोलीस पाटील अंबादास ढगे,ग्रामपंचायत सचिव कडुबा ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ रोकडे, बँक ऑफ महाराष्ट्रचे दत्ता गाडेकर, ग्रामीण बँक जरंडीचे ज्ञानेश्वर सुस्ते,अमृतबाग हॉटेलचे संचालक शुभम गिरी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजेशजी गिरी,उपाध्यक्ष विष्णुशेठ दुसाने,संचालक आकाश वरकड,युवराज आगे,एस. टी. पाटील, बाबू पटेल,सतीश कोलते,अर्जुन बोडखे,कदीर शहा,राहुल गोसावी, रवि अप्पा इंगळे व अमोल निकम, तसेच कर्मचारी ज्ञानेश्वर पाटील, सुनील सैंदाने, देवा बैरागी आणि गणेश पवार यांच्यासह संस्थेचे सभासद व खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.सभेचे प्रास्ताविक संचालक सतीश कोलते यांनी केले. वार्षिक कामकाजाचा आढावा घेण्यात आला तसेच संस्थेच्या प्रगतीसंदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष ॲड. राजेश गिरी यांनी उपस्थितांचे आभार मानले. सभेनंतर सर्व उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

# शिक्षक मतदारसंघाची निवडणूक- २०२६ : काँग्रेसच्या पुनर्जन्माची नांदी ठरणार का?

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : अमरावती विभागातील काँग्रेस पक्ष सध्या एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. विधानसभा निवडणुकीतील अपयश, विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील पराभव आणि पक्षांतर्गत गटबाजीमुळे काँग्रेसची संघटनात्मक ताकद कमकुवत झाल्याचे चित्र दिसत आहे. अनेक दशकांपासून काँग्रेसची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचवणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांमध्येही निराशा निर्माण झाली आहे.

लोकसभा निवडणुकीत बळवंत वानखेडे यांच्या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले होते. काँग्रेस पुन्हा उभारी घेईल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र त्यानंतरच्या विधानसभा आणि विधान परिषद निवडणुकांतील निकालांनी त्या आशांवर पाणी फेरले. यामुळे काँग्रेससमोर केवळ निवडणूक जिंकण्याचे नव्हे, तर स्वतःची विश्वासार्हता आणि संघटनात्मक ताकद पुन्हा निर्माण करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

याच पार्श्वभूमीवर ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ मध्ये होणारी शिक्षक मतदारसंघाची निवडणूक काँग्रेससाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. ही निवडणूक केवळ विधान परिषदेची एक जागा जिंकण्याची संधी नाही, तर पक्षाची हरवलेली प्रतिष्ठा पुनर्स्थापित करण्याची आणि जनमानसातील विश्वास पुन्हा मिळवण्याची ऐतिहासिक संधी आहे.

आज कार्यकर्त्यांच्या मनातील सर्वात मोठा प्रश्न असा आहे की काँग्रेस या निवडणुकीत पुन्हा एखाद्या आयात उमेदवारावर विश्वास ठेवणार का? विविध पक्षांमध्ये उड्या मारणाऱ्या, शैक्षणिक क्षेत्राशी थेट संबंध नसलेल्या किंवा केवळ आर्थिक ताकदीच्या जोरावर राजकारण करणाऱ्या व्यक्तींना उमेदवारी देऊन पक्षाला नेमका काय फायदा होणार आहे? अशा व्यक्ती निवडून आल्यावर पक्षाच्या संघटनात्मक उभारणीत किती योगदान देणार, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे.

शिक्षक मतदारसंघ हा सामान्य राजकीय मतदारसंघ नाही. येथे शिक्षक, प्राध्यापक, शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू आणि जागरूक मतदार मतदान करतात. त्यामुळे या मतदारसंघात केवळ पैसा किंवा राजकीय प्रभाव पुरेसा ठरत नाही. शैक्षणिक क्षेत्रातील काम, सामाजिक स्वीकार्यता, वैचारिक बांधिलकी, नेतृत्वक्षमता आणि संघटन उभारण्याची क्षमता हे गुण अधिक महत्त्वाचे ठरतात.

काँग्रेसने जर या निवडणुकीकडे केवळ उमेदवार निवडीचा कार्यक्रम म्हणून पाहिले तर ती मोठी चूक ठरेल. उलट पक्षाने याला संघटनात्मक पुनर्बांधणीची मोहीम मानले पाहिजे. आज निवडणुकीसाठी अवघे चार महिने शिल्लक आहेत. या चार महिन्यांत पाच जिल्हे आणि सुमारे ५६ तालुक्यांतील शिक्षकांपर्यंत



पोहोचणे ही काँग्रेससाठी मोठी कसोटी असणार आहे. भारतीय जनता पक्षाने शिक्षक मतदारसंघाच्या पार्श्वभूमीवर विविध जिल्ह्यांमध्ये मेळावे, संवाद कार्यक्रम, संघटनात्मक बैठका आणि संभाव्य मतदारांशी संपर्क मोहीम सुरू केली आहे. त्याच धर्तीवर काँग्रेसनेही तातडीने जिल्हा, तालुका आणि शहर स्तरावर शिक्षक मेळावे, शिक्षण परिषद, संवाद सभा आणि विविध शिक्षक संघटनांशी चर्चासत्रांचे आयोजन करणे आवश्यक आहे.पक्षाने प्रथम शिक्षक संघटना, शिक्षण क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती, प्राध्यापक, मुख्याध्यापक आणि युवा शिक्षक नेत्यांशी संवाद साधून व्यापक सहमती निर्माण करावी. त्यानंतर सर्वांना मान्य होईल असा सक्षम, संघर्षशील, अभ्यासू आणि निष्ठावान उमेदवार निश्चित करावा. उमेदवाराची घोषणा शेवटच्या क्षणी करण्याऐवजी त्याला वेळेत मैदानात उतरवून विभागभर प्रचाराचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. आज काँग्रेससमोर निवड केवळ एका उमेदवाराची नाही, तर पक्षाच्या भवितव्याची आहे. जर पक्षाने गटबाजी, व्यक्तिपूजा आणि आर्थिक निकष बाजूला ठेवून तळागाळातील निष्ठावान नेतृत्वावर विश्वास दाखवला, तर शिक्षक मतदारसंघ काँग्रेसच्या पुनरुज्जीवनाचा पाया ठरू शकतो. लोकसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांनी ज्या एकजुटीने काम करून विजय मिळवून दिला, त्याच पद्धतीने शिक्षक मतदारसंघातही काँग्रेसने विचारांशी बांधिलकी असलेल्या, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या आणि संघटनात्मक क्षमता असलेल्या नेतृत्वाच्या पाठीशी उभे राहिले, तर इतिहास घडू शकतो.

आज काँग्रेससमोर दोन मार्ग आहेत. एक म्हणजे पुन्हा आयात नेतृत्व, गटबाजी आणि तात्पुरत्या समीकरणांच्या राजकारणाचा मार्ग. दुसरा म्हणजे आत्मपरीक्षण, संघटनात्मक शुद्धीकरण आणि नव्या नेतृत्वाला संधी देण्याचा मार्ग. यापैकी दुसरा मार्ग निवडला तर शिक्षक मतदारसंघाची निवडणूक काँग्रेसच्या पुनर्जन्माची सुरुवात ठरू शकते. पराभवाची धूळ झटकून नव्या उमेदीने उभे राहण्याची हीच वेळ आहे. शिक्षक मतदारसंघ काँग्रेससाठी केवळ निवडणूक नाही, तर पक्षाच्या भवितव्याची, संघटनात्मक पुनर्बांधणीची आणि जनविश्वास पुन्हा मिळवण्याची निर्णायक परीक्षा आहे. या परीक्षेत काँग्रेसने योग्य निर्णय घेतला, तर अमरावती विभागात पक्षाच्या नव्या पर्वाची सुरुवात होऊ शकते.

**डॉ. मेघश्याम करडे,**
**अमरावती**
**94041 03539**

# SFI – DYFI यांचे वैज्ञानिक दृष्टीकोन वर विद्यार्थी जिल्हा स्तरीय शिबिर

**दैनिक युवक आधार**
**डॉ सुनिल भगत प्रतिनिधी** : स्टूडेंट फेडरेशन ऑफ इंडिया आणि डेमोक्रेटिक फेडरेशन ऑफ इंडिया संघटने तर्फे १५ -१६ जून २०२६ रोजी एके गोपालन भवन , कॉम्रेड भवन शनिवारी कॉटन मार्केट खंडोबा देवस्थानच्या मागे नागपूर येथे जिल्हा निवडक विद्यार्थी जिल्हा स्तरीय शिबिर आयोजित करण्यात आले होते.




कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा संघटक श्री जाधव यांनी केली. श्री हटवार यांनी ह्या दोन दिवसीय शिबिराचे प्रास्ताविक केले. रामटेके यांनी संचालन आणि आभार प्रदर्शन केले.प्रथम सत्र हे वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्काराचे सादरीकरण ह्यावर आधारित होते. ह्यानिमित डॉ सुनील भगत, जिल्हा कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती , नागपूर ह्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन ह्यावर सखोल उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.रामभाऊ डोंगरे, राज्य समन्वयक, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांनी चमत्काराचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांना बुवाबाबा कसे हे प्रयोग करून जनतेला फसवतात हे सिद्ध करून दाखवले.ह्यानिमित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर च्या मंगला गाणार, सुषमा शेवडे, प्रिया गजभिये, आंबेकर आणि शारदा मोटघरे हे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी चळवळीचे गीत सादर केले.ह्या शिबिरासाठी अंदाजे ५० च्या आसपास विद्यार्थी उपस्थित होते.

# महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे श्रीवर्धन दौऱ्यावर

## विकासकामांची पाहणी व 'जनता संवाद' कार्यक्रम



**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री मा. ना. कु. आदिती वरदा सुनील तटकरे यांनी आज श्रीवर्धन तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यामध्ये त्यांनी विविध शासकीय कार्यक्रमांना उपस्थिती लावत विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली तसेच नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या व मागण्या जाणून घेतल्या.

मंत्री आदिती तटकरे यांनी श्रीवर्धन येथील माळी समाज सभागृह, दाबक पाखाडी येथे आयोजित तालुकास्तरीय कृषी मेळाव्याला उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधत शेतीविषयक विविध विषयांचा आढावा घेतला. या कार्यक्रमाला स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.यानंतर त्यांनी श्रीवर्धन परिसरातील विविध महत्त्वाच्या विकासकामांची पाहणी केली. यामध्ये साकारण्यात येत असलेल्या ऐतिहासिक पेशवे स्मारकाच्या कामाची पाहणी, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नियोजित पुतळ्याच्या कामाचा आढावा तसेच श्रीवर्धन समुद्रकिनारा परिसरातील सुरू असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

तसेच श्रीवर्धन येथील न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या कामाची पाहणी करून कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दौऱ्याच्या शेवटी श्रीवर्धन येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित 'जनता संवाद' कार्यक्रमातून मंत्री आदिती तटकरे यांनी नागरिक, महिला आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या समस्या व मागण्या ऐकून घेतल्या. विविध स्थानिक प्रश्नांवर संबंधित प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या.

या दौऱ्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, नागरिकांच्या विविध प्रश्नांवर प्रशासन स्तरावर सकारात्मक कार्यवाही होण्याची शक्यता आहे.

# नवी मुंबईत लेडीज बारमधील अश्लीलतेविरोधात महिला एकवटल्या

## १४ जुलै रोजी पोलीस आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : रायगड आणि नवी मुंबई परिसरातील लेडीज कम ऑर्केस्ट्रा बारमध्ये सुरू असलेल्या अवैध आणि अनैतिक प्रकारांविरोधात आता महिला शक्तीने थेट आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. स्थानिक पोलीस आणि प्रशासनाच्या तात्पुरत्या कारवाईला कंटाळून 'क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशन'च्या अध्यक्षा रुपाली राम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दिनांक १४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजल्यापासून नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाबाहेर आमरण उपोषण करण्यात येणार आहे. याबाबतचे अधिकृत निवेदन आणि परवानगीचे पत्र आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला सादर केले आहे.



**मुख्य आक्षेप आणि प्रकरण?**

क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनने प्रशासनाचे लक्ष वेधताना बार चालकांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत:

अधिवेशनाचा बनावट प्रामाणिकपणा: राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना हे सर्व लेडीज बार अचानक नियमांचे पालन करू लागतात किंवा पूर्णपणे बंद राहतात. यावरून स्पष्ट होते की, बार चालकांना प्रशासनाचा आणि कायद्याचा धाक आहे.

अधिवेशनानंतर पुन्हा 'धांगडधिंगा': अधिवेशन संपताच या बारमध्ये रात्री उशिरापर्यंत अश्लील नृत्य, आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन आणि छुप्या पद्धतीने देहविक्रीसारखे गंभीर गैरप्रकार पुन्हा सुरू होतात.

तरुण पिढीवर परिणाम: या अवैध व्यवसायांमुळे स्थानिक तरुण पिढी अमली पदार्थ आणि अनैतिकतेच्या आहारी जाऊन उद्ध्वस्त होत असून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**कायदेशीर तरतुदी आणि न्यायालयाचे कडक नियम**

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, लेडीज ऑर्केस्ट्रा बार आणि डान्स बारच्या नावाखाली चालणाऱ्या गैरप्रकारांवर कायद्यात अत्यंत कडक तरतुदी आहेत:महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि डान्स हॉल्स (महिलांचे संरक्षण आणि अश्लील नृत्यांवर बंदी) कायदा, २०१६: या कायद्यानुसार बारमध्ये कोणत्याही प्रकारच्या अश्लील नृत्याला पूर्णपणे बंदी आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास बारचा परवाना (License) कायमचा रद्द होऊ शकतो आणि मालकावर दंडात्मक तसेच अटकेची कारवाई होऊ शकते. देहविक्री प्रतिबंधक कायदा (PITA): ऑर्केस्ट्रा बारच्या आडून छुप्या पद्धतीने देहविक्री (Prostitution) चालवणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. यामध्ये अडकलेल्या महिलांची सुटका करून बार चालकांवर कडक कलमांखाली गुन्हे नोंदवण्याची तरतूद आहे.

ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम आणि वेळेची मर्यादा: सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार रात्री १० किंवा ११ नंतर आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन करणे कायदेशीर गुन्हा आहे.

**'तात्पुरती कारवाई नको, कायमचा बंदोबस्त हवा'"**

आम्ही स्थानिक प्रशासनाकडे अनेकदा लेखी तक्रारी केल्या, परंतु पोलिसांकडून केवळ नावापुरती आणि तात्पुरती कारवाई केली जाते. पोलीस पाठ फिरवताच हे अवैध धंदे पुन्हा जोमाने सुरू होतात," असा थेट आरोप संस्थापिका अध्यक्षा रुपाली राम शिंदे यांनी केला आहे. स्थानिक नागरिक आणि महिलांना होणारा मनस्ताप कायमचा संपवण्यासाठीच हे आमरण उपोषण छेडण्यात येत असल्याचे फाउंडेशनतर्फे सांगण्यात आले आहे.या आंदोलनामुळे आता नवी मुंबई पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग (Excise Department) या लेडीज बारवर कोणती ठोस आणि कायमस्वरूपी कायदेशीर कारवाई करणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्रातील पाटील कुळाचा कुलवृक्ष 'पाटला' चे पानवडोदमध्ये रोपण

## अति दुर्मिळ, आय.यू.सी.एन.यादीत समाविष्ट 'पाटला' प्रजातीचा वृक्ष



**पाटला वृक्षाची खासियत**

'स्टिरीओस्परमम सौवेलेन्स' असे शास्त्रीय नाव असलेला हा वृक्ष जैन धर्मात भगवान महावीरांचा चैत्य वृक्ष असून त्यांनी या वृक्षाखाली साधना केली आहे. तसेच बौद्ध धर्मातील विपस्सी या बुद्धांना याखाली ज्ञान प्राप्त झाले आहे.

**हा वृक्ष बहुगुणी, बहुनामी**

आयुर्वेदात दशमूळ औषधात हा महत्त्वाचा घटक वृक्ष आहे. आदिवासी बांधव विंचू दंशावर याचा वापर करतात.
यास संस्कृतमध्ये अलीवल्लभ, मधू धुती असेही म्हणतात.

**आय.यू.सी.एन.च्या यादीत संकटग्रस्त**

**महाराष्ट्रात ही तुरळक झाडे शिल्लक असून आपल्या जिल्ह्यात २ ते ३ च झाडे निसर्गतः नोंद आहेत. या वृक्षाच्या फुलांकडे मधमाशा मोठ्या प्रमाणात आकर्षित होतात, त्यांना हा वृक्ष मकरंद पुरवून जगवतो. म्हणून यास संस्कृतमध्ये अलीवल्लभ म्हणतात. ४ हजार वर्षांपूर्वी वेदात असे म्हटले आहे की, 'अली वल्लभ भ्रमरार्णा प्रिया, मधूमय त्वात'. पँसी वर्गातील फुलपाखरे यांचा हा यजमान वृक्ष आहे.**

**– डॉ. संतोष पाटील, अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड.**

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : अनेक आडनावे कुळ यांना वृक्ष देवक आहेत. पाटील या कुळाचा देवक आहे "पाटला" वृक्ष. २५०० वर्षांपूर्वी मगध राजा अजातशत्रू याने पाटलीपुत्र नगर वसविले. या भागात पाटला ची खूप झाडे होती म्हणून त्यास पाटलीपुत्र हे नाव दिले. ते आजचे पटना शहर होय. महाराष्ट्रात शिलाहार राजवटीत पाटीलकीचे वतन निर्माण झाले. तेव्हा या कुळाचा पाटला हा वृक्ष देवक समजला जायचा. आपल्या कुला नुसार आपण वृक्ष जोपासले, लावले तर राज्य निसर्ग समृद्ध होईल या भावनेने सिल्लोड येथील पर्यावरण संवर्धक डॉ. संतोष पाटील यांनी पानवडोद येथे पवन पाटील यांच्या शेतात ही ३ रोपे अत्यंत सुरक्षित ठिकाणी माधव बागेत रोपण केली. यावेळी पवन पाटील, विक्रांत पाटील, विजय पाटील, सचिन पाटील, अनिल पाटील यांची उपस्थिती होती. मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसाला अंतरवाली सराटी येथे ही १० रोपे लावण्यात येणार आहे.

# रेवदंड्यात २२ लाखांचा गुटखा जप्त; गुन्हा गेला कुठे? तडजोडीच्या चर्चांनी पोलिस कारभारावर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : रेवदंडा परिसरात रविवारी पहाटे झालेल्या कथित गुटखा जप्तीच्या कारवाईने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, "२२ लाखांचा गुटखा पकडला, पण गुन्हा कुठे दाखल झाला?" असा थेट सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणामुळे पोलिस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला जात असून, घटनेची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चेनुसार, रविवारी पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास रेवदंडा परिसरात अंदाजे २२ लाख रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला होता. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात बंदी घातलेला गुटखा आढळूनही संबंधितांवर कोणता गुन्हा दाखल झाला, किती आरोपींना ताब्यात घेण्यात आले आणि जप्त मालाचे पुढे काय झाले, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या संपूर्ण कारवाईभोवती गूढ निर्माण झाले आहे.याचदरम्यान, सुमारे साडेसात लाख रुपयांच्या कथित तडजोडीनंतर संबंधित माल आणि प्रकरण "सेटल" करण्यात आल्याच्या चर्चांनी आणखी संशयाचे वातावरण निर्माण केले आहे. या चर्चांमध्ये किती तथ्य आहे याची अधिकृत पुष्टी नसली तरी, पोलिस प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका न घेतल्याने नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत.

**गुटखाबंदी कागदावरच?**

महाराष्ट्रात गुटखा विक्री, साठवणूक आणि वाहतूक यावर बंदी असताना देखील रायगड जिल्ह्यात अनेक भागांमध्ये गुटख्याचा अवैध व्यापार राजरोसपणे सुरू असल्याचा आरोप सातत्याने होत आहे. रेवदंडा परिसरातील एक कथित गुटखा माफिया अलिबाग, मुरुड, रोहा, श्रीवर्धन आणि तळा तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुटख्याचा पुरवठा करीत असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर रंगली आहे. त्यामुळे या अवैध व्यवसायामागे कोणाचा आशीर्वाद आणि संरक्षण आहे, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

**एकीकडे कारवाई, दुसरीकडे तडजोड?**

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासन विभागाकडून अवैध गुटखा व्यवसायाविरोधात धडक कारवाया सुरू असल्याचे चित्र आहे. मात्र दुसरीकडे रेवदंड्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात गुटखा पकडल्याची चर्चा होत असताना, त्यावर कोणतीही ठोस कायदेशीर कारवाई झाल्याचे दिसून येत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कथित कारवाईनंतरही संबंधित गुटखा व्यावसायिक खुलेआम व्यवसाय करीत असल्याची चर्चा सुरू आहे. जर हे खरे असेल, तर कायद्याचा धाक नेमका कुणासाठी आहे, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

**जनतेची चौकशीची मागणी**

या संपूर्ण प्रकरणात खालील बाबींचा खुलासा करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे :

प्रत्यक्षात किती रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला?कोणत्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्यात आली?संबंधितांवर कोणते गुन्हे दाखल करण्यात आले?जप्त माल सध्या कुठे आहे?

तडजोडीच्या चर्चांमध्ये कितपत तथ्य आहे?

संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका काय होती?

राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना रेवदंड्यातील या चर्चित प्रकरणाची दखल घेऊन वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, तसेच संपूर्ण घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# 4 लाख 75 हजार रुपयांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पोलीस असल्याचे सांगून 4 लाख 75 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 24 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. डिसेंबर 2025 ते 2026 पर्यंत आरोपी प्रणव उर्फ संतोष वाळुंजे (राहणार तळोजा), महादेव कोंडीलकर (राहणार जांभिवली), नथुराम पवार (राहणार रसायनी) यांनी पोलिसांचे कपडे घालून पोलीस असल्याचे फिर्यादी सत्यवान वसंत घरत (राहणार आर वन करंजाडे) यांना भासवले आणि फिर्यादी सत्यवान घरत यांचे लोकांकडे असलेले रक्कम काढून देतो असे सांगून त्या बदल्यात त्यांच्याकडून दोन लाख रुपये घेतले. त्यानंतर कोणतीही रक्कम वसूल करून न देता त्यांची फसवणूक केली. तसेच सत्यवान घरत यांच्या ओळखीच्या लोकांकडून त्यांच्या नावाने दोन लाख 75 हजार रुपये घेतले आणि ती रक्कम देखील त्यांना न देता त्या रकमेचा अपहार केला.

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून 56.69 कोटी रुपयांचे अंमली पदार्थ नष्ट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,प्रतिनिधी** : जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने अंमली पदार्थांविरोधातील मोहिमेत महत्त्वपूर्ण कारवाई करत 26 गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेले तब्बल 56 कोटी 69 लाख 55 हजार 192 रुपये किंमतीचे अंमली पदार्थ नष्ट केले.

'नशा मुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत अंमली पदार्थांविरोधात सातत्यपूर्ण, समन्वयित आणि कठोर कारवाई सुरू असून, आतापर्यंत 166 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत सुमारे 57 कोटी रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. या अभियानाच्या पुढील टप्प्यात जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून समाजातील व्यसनाधीनतेला आळा घालण्याच्या उद्देशाने जप्त करण्यात आलेले अंमली पदार्थ शासनमान्य मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी, तळोजा (ता. पनवेल, जि. रायगड) येथे कायदेशीर प्रक्रियेचे पालन करून नष्ट करण्यात आले. यावेळी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे तसेच पोलीस उपआयुक्त (गुन्हे शाखा) सचिन गुंजाळ उपस्थित होते. अंमली पदार्थांविरोधातील लढा अधिक प्रभावी करण्यासाठी




नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत 'नशा मुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत मागील दोन दिवसांत शहरातील शाळा, महाविद्यालये, गृहनिर्माण संस्था आणि सार्वजनिक ठिकाणी व्यापक जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. सुमारे 25 शाळा व महाविद्यालयांतील 5 हजार विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय अंमली पदार्थांबाबत नागरिकांकडून माहिती मिळावी यासाठी 88281-112-112 हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. नागरिक या क्रमांकावर गोपनीय स्वरूपात माहिती देऊ शकतात. माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असल्याची ग्वाही पोलीस प्रशासनाने दिली आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून भविष्यातही अंमली पदार्थांविरोधातील कारवाई अधिक तीव्र, कायदेशीर आणि समन्वयात्मक पद्धतीने सुरू ठेवण्यात येणार असून नागरिकांनी निर्भयपणे आणि गोपनीयतेने माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खांदेश्वर पोलिसांकडून १८ वर्षीय तरुणीचा शोध; नागरिकांना आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : खांदेश्वर पोलीस ठाण्यात मोठे मनुष्य मिसिंग रजिस्टर क्रमांक ८५/२०२६ मधील मिसिंग मुलगी नामे अरिझा फिरोज सय्यद (वय १८ वर्षे ४ महिने) हिचा शोध सुरू असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन खांदेश्वर पोलिसांनी केले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार शाजीया बेगम फिरोज सय्यद (रा. बालाजी सिम्फनी, के-विंग, फ्लॅट क्र. २७०२, सुकापूर, ता. पनवेल, जि. रायगड) यांची मुलगी अरिझा ही दि. २१ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.०० वाजता "खाली जाऊन येते" असे सांगून घरातून बाहेर पडली. त्यानंतर ती परत न आल्याने नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला; मात्र तिचा काहीही ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे खांदेश्वर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

मिसिंग तरुणीचा रंग गोरा, उंची अंदाजे ५ फूट, लांब काळे केस, सरळ नाक, काळे डोळे अशी ओळख असून ती घरातून बाहेर पडताना पांढऱ्या रंगाचा फुलबाह्यांचा शर्ट व निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट परिधान केली होती. तिला हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहे.

या तरुणीबाबत कोणालाही कोणतीही माहिती मिळाल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा तपास अधिकारी श्वेता पाटील 9637474915 यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे केवळ बोलके नव्हे, तर 'कर्ते सुधारक' होते – दशरथ मडावी

## विविध संघटनेच्या आयोजनाखाली उमरखेड येथे राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : "राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि न्यायाची संकल्पना केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्षात राबवली. ते केवळ बोलके सुधारक नव्हते, तर समाजात क्रांतिकारी बदल घडवून आणणारे 'कर्ते सुधारक' होते," असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत तथा राष्ट्रीय क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष माननीय दशरथ मडावी यांनी केले.

उमरखेड येथे आज २६ जून रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य व्याख्यान व अभिवादन कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ॲड. संतोष जैन साहेब यांनी भूषवले.

**शाहू महाराजांच्या पुरोगामी निर्णयांचा वेध**

आपल्या मार्गदर्शनात प्रा. दशरथ मडावी यांनी शाहू महाराजांच्या जीवनातील विविध प्रेरक पैलूंवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की:जातीभेद निर्मूलनाचे प्रत्यक्ष पाऊल: समाजात क्रांती घडवण्यासाठी महाराजांनी अस्पृश्यता निवारणाचे काम स्वत:पासून सुरू केले. त्यांनी गंगाराम कांबळे यांना हॉटेल थाटून दिले व स्वतः तिथे रोज चहा पिण्यास जाऊन समाजाला एक नवा संदेश दिला.

सक्तीचे व मोफत शिक्षण: बहुजन समाज शिकला पाहिजे यासाठी त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. इतकेच नव्हे तर, जो पालक आपल्या मुलाला शाळेत पाठवणार नाही, त्याला 'प्रतिदिवस १ रुपया' दंडाची तरतूद केली.

वस्तीगृहांची चळवळ: गरिबांच्या आणि वेगवेगळ्या जाती-जमातींच्या मुलांना शिक्षणासाठी शहरात राहता यावे, म्हणून त्यांनी कोल्हापुरात विविध वस्तीगृहांची स्थापना केली, जी पुढे शिक्षणाची मोठी केंद्रे बनली.

आरक्षण आणि रोजगार: देशात सर्वप्रथम ५० टक्के आरक्षणाची ऐतिहासिक घोषणा करून त्यांनी वंचित, शोषित घटकांना प्रशासन,




आरोग्य आणि रोजगारात मुख्य प्रवाहात आणले.

राजर्षी शाहू महाराज: एक युगपुरुष (विशेष माहिती)

**क्रांतीचे जनक शाहू महाराज:** २६ जून १८७४ रोजी जन्मलेले शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. त्यांनी केवळ सामाजिक सुधारणाच केल्या नाहीत, तर शेती, उद्योग, कला आणि क्रीडा क्षेत्रालाही राजाश्रय दिला. राधानगरी धरणाची निर्मिती करून त्यांनी शेतकऱ्यांना पाण्याचे महत्त्व पटवून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाला ओळखणारे आणि त्यांना "दलितांचे खरे नेते" म्हणून घोषित करणारे शाहू महाराज हे सामाजिक लोकशाहीचे खरे शिल्पकार होते.

**विविध संघटनांचा संयुक्त पुढाकार आणि मान्यवरांची उपस्थिती**

या गरिमापूर्ण कार्यक्रमाचे आयोजन मराठा सेवा संघ, बिरसा क्रांती दल उमरखेड, शेतकरी कष्टकरी संघ आणि शाहू महाराज स्मारक समिती, उमरखेड यांच्या वतीने संयुक्तपणे करण्यात आले होते.

या विचारपीठावर प्रमुख उपस्थिती म्हणून:

मा. वि. ना. कदम (सेवानिवृत्त प्राचार्य)प्रा. काशिनाथ लाहोरे मा. सुरेश कदम मा.देवानंद मोरे

मा. डी. बी. अंबुरे, विनोद काळे, व्ही. डी. कोवे हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाला उमरखेड परिसरातील बहुजन समाजातील विविध जाती-जमातींचे नागरिक, महिला व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन आणि संचालन श्री. चक्रधर देवसरकर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले,

तर उपस्थितांचे आभार श्री.उत्तम बरवड,यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व समाजबांधवांनी मोलाचे सहकार्य केले.

## उरणमध्ये 28 जून रोजी 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण अभियान'

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** " दो बुंद हर बार, पोलिओ पर जीत बरकरार" हे घोष वाक्य घेऊन 28 जून 2026 रोजी संपूर्ण राज्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविली जाणार आहे.या मोहिमे अंतर्गत ग्रामीण तसेच शहरी भागांतील 0 ते 5वर्षे वयोगटांतील बालकांना पोलिओ लस देण्यात येणार आहे.

उरण तालुका त्याला अपवाद नसून या अभियानांतर्गतइंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण या केंद्रा तून संपूर्ण उरण तालुक्यात रविवार, 28 जून 2026 रोजी 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण अभियान 2026' राबवण्यात येणार आहे.



या अभियानात 0 ते 5 वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत. सकाळी 8 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत ग्रामीण रुग्णालय उरण तसेच तालुक्यातील सर्व पोलिओ लसीकरण केंद्रांवर ही मोहीम राबवली जाणार आहे.

आरोग्य विभागाने सर्व पालक व नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या घरातील तसेच शेजारच्या 0 ते 5 वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब आवर्जून पाजावेत. यापूर्वी पोलिओ लस घेतली असली तरीही पुन्हा लस देणे आवश्यक आहे, कारण 'दोन थेंब जीवनाचे' हे प्रत्येक बालकासाठी गरजेचे आहेत. पोलिओमुक्त भारत घडवण्यासाठी नागरिकांच्या सहकार्याची नितांत आवश्यकता असल्याने आपल्या बालकाच्या उज्ज्वल व निरोगी भविष्यासाठी 28 जून रोजी जवळच्या लसीकरण केंद्रावर जाऊन पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत. अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या आरोग्य केंद्राशी किंवा ग्रामीण रुग्णालय उरण येथे संपर्क साधावा, असे उरण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो कलेल यांनी सांगितले आहे.

## खासदार संजय दिना पाटील यांच्यावर कठोर कारवाईची मागणी; व्हॉईस ऑफ मीडिया लाखनीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** वृत्तसंकलनासाठी गेलेल्या पत्रकारांशी शिवसेना (शिंदे गट) चे खासदार संजय दिना पाटील यांनी कथितरित्या अपमानास्पद वक्तव्य, अश्लील शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या निषेधार्थ व्हॉईस ऑफ मीडिया, लाखनी तालुक्याच्या वतीने काळ्या फिती लावून तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. यानंतर लाखनी पोलीस निरीक्षक आशिष गजभिये यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करून संबंधित खासदारांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांना लोकप्रतिनिधींकडून अशा प्रकारची अपमानास्पद वागणूक मिळणे




ही अत्यंत गंभीर बाब असून, ती लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांवर आघात करणारी आहे. पत्रकार हे शासन आणि जनतेमधील महत्त्वाचा दुवा असून, जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे आणि निर्भयपणे सत्य मांडणे हे त्यांचे घटनात्मक कर्तव्य आहे. अशा परिस्थितीत पत्रकारांना धमक्या देणे किंवा त्यांचा अवमान करणे हे मुक्त आणि निर्भय पत्रकारितेसाठी धोक्याचे संकेत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात पत्रकारांना सुरक्षित आणि सन्मानाने काम करता यावे, यासाठी शासनाने कठोर भूमिका घेण्याची आवश्यकता असल्याचे व्हॉईस ऑफ मीडियाने स्पष्ट केले आहे. तसेच या प्रकरणाची मुख्यमंत्री यांनी स्वतः दखल घेऊन दोषींवर योग्य ती कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, अशी ठाम मागणी करण्यात आली.

या निवेदनावर कालिदास खोब्रागडे, रवी धोतरे, अनिल शेंडे, चंदन मोटघरे, रोशन खोब्रागडे, राजू पाशा भाई खान, शमीम आकबानी, शैलेश उरकुडे, भावेश धुंधूकिया आणि स्वप्नील काटवले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दरम्यान, या घटनेमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, राज्यभरातील पत्रकार संघटनांमध्येही तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पत्रकारांचा सन्मान आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी पत्रकारांकडून जोर धरत आहे.

## खासदार संजय दिना पाटील यांचा टेंभुर्णीत निषेध, पत्रकारांना धमक्या दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याच मागणी

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद/ टेंभुर्णी प्रतिनिधी:** - अनिल ससाने जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील मराठी पत्रकार संघाच्या वतीने ईशान्य मुंबईचे वाचाळवीर शिवसेना शिंदे गटाचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना धमक्या देऊन अश्लील भाषेत लोकशाहीचा अवमान केल्याप्रकरणी तीव्र निषेध नोंदवण्यात आला. तसेच त्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करत टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश राठोड यांना निवेदन देण्यात आले.

टेंभुर्णी मराठी पत्रकार संघाची एक तातडीची बैठक संघटनेचे अध्यक्ष शेख साबेर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी खासदार संजय दिना



पाटील यांनी पक्ष बदल केल्यानंतर मुंबईच्या पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, शासकीय अधिकारी व पोलीस अंगरक्षक यांच्यासमोरच पत्रकारांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून *"जीवे मारण्याच्या धमक्या"* दिल्याचा आरोप करण्यात आला.

"सत्ताधारी पक्षात राहून चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांना अशा प्रकारे धमकावणे हे लोकशाहीला काळीमा फासणारे कृत्य आहे. लोकप्रतिनिधीकडून अशी अपेक्षा नाही,"* असे संतप्त मत बैठकीत व्यक्त करण्यात आले.

या घटनेचा निषेध नोंदवून खासदार संजय दिना पाटील यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा व नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी खासदारकीचा राजीनामा द्यावा, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.निवेदन देताना मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष शेख साबेर यांच्यासह रानाअंभोरे, शेख नसीम, अलकेश सोमाणी, बी. डी. सवडे, गजानन देठे, विष्णू मगर, प्रताप नवले, अशोक पाबळे, सुनील भाले, फकरु कुरेशी, मंहमद बाईय्यास, सुनील जोशी, अनिल ससाने,प्रल्हाद जाधव, शेख आशपाक आदी पदाधिकारी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनानिमित्त आनंद विद्यार्थी आश्रमात शालेय साहित्य, ब्लँकेट व मिठाईचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधून निफाड येथील आनंद विद्यार्थी आश्रमात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, ब्लँकेट तसेच मिठाईचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम दक्षता समितीच्या अध्यक्षा वेदिका होळकर यांच्या वतिने साजरा करण्यात आला यानिमित्त प्रमुख अतिथी म्हणून माया होळकर, आरती निकाळे. फरीदा काझी शांताबाई साळुंखे.




यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना वेदिका होळकर म्हणाल्या की, "राजर्षी शाहू महाराजांनी न्याय, बंधुता आणि समानतेची मूल्ये समाजात रुजविण्याचे महान कार्य केले. समाजातील सर्व घटकांना समानतेची वागणूक देत जातीभेद निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, महिलांच्या उन्नतीसह बहुजन समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यामुळेच शाहू महाराजांना आरक्षणाचे जनक म्हणून ओळखले जाते."कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, ब्लँकेट आणि मिठाईचे वितरण करण्यात आले. तसेच उपस्थित मान्यवरांचा सत्कार आश्रमाचे अधीक्षक सुरेंद्र पगारे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला आश्रमातील विद्यार्थी, कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभली. सामाजिक न्याय, शिक्षण आणि समानतेचा संदेश देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## माहितीचा अधिकार कायद्यातील दुरुस्तीविरोधात आझाद मैदानात भव्य आंदोलन; "सरकार न सुधारल्यास न्यायालयात जाणार;" सुभाष बसवेकर

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : माहितीचा अधिकार (RTI) कायद्यात करण्यात आलेल्या बदलाविरोधात मुंबईच्या ऐतिहासिक आझाद मैदानावर तीव्र पडसाद उमटले. महाराष्ट्र राज्य माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी राज्यभरातून आलेल्या हजारो माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी भव्य आंदोलन केले. १२ जून २०२६ रोजी माहितीचा अधिकार कायद्यात करण्यात आलेल्या दुरुस्त्या तात्काळ रद्द कराव्यात, या मुख्य मागणीसाठी हे आंदोलन सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत पार पडले. यात महाराष्ट्रातील विविध भागांतून




आलेले माहिती अधिकार कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

"शासनाने केलेल्या नव्या दुरुस्त्यांमुळे माहिती अधिकार कायद्याचा मुख्य आत्मा धोक्यात येईल. तसेच प्रशासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वावर याचा अत्यंत वाईट परिणाम होईल," असा थेट आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

आंदोलनाला संबोधित करताना महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर म्हणाले, "माहितीचा अधिकार हे लोकशाही मजबूत करणारे आणि सर्वसामान्यांना बळ देणारे एक प्रभावी शस्त्र आहे. जर सरकारने हा कायदा कमकुवत करण्याचा प्रयत्न केला, तर त्याचा थेट फटका देशातील आम जनतेला बसेल. महाराष्ट्र सरकारने आंदोलनकर्त्यांच्या मागण्या गांभीर्याने घेतल्या नाहीत, तर महासंघ या हुकूमशाही वृत्तीविरोधात न्यायालयात दाद मागेल आणि लोकशाही मार्गाने आपली लढाई पुढे सुरूच ठेवेल"

या आंदोलनादरम्यान महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी एक महत्त्वाची घोषणा केली. माहिती अधिकार चळवळीचे मुख्य प्रेरणास्थान आणि या कायद्याचे जनक जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या पाठीशी महासंघ खंबीरपणे उभा आहे.आगामी काळात अण्णा हजारे यांनी या कायद्याच्या रक्षणासाठी कोणतेही आंदोलन किंवा उपोषण पुकारल्यास महासंघाचे सर्व कार्यकर्ते त्यात सक्रिय सहभाग नोंदवून पूर्ण ताकतीने पाठिंबा देतील असा ठराव यावेळी करण्यात आला.


आंदोलनाच्या शेवटी राज्य सरकारकडे एका निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली की माहिती अधिकार कायद्यातील सर्व वादग्रस्त दुरुस्त्या तात्काळ मागे घेण्यात याव्यात आणि नागरिकांचा माहिती मिळवण्याचा हक्क सुरक्षित ठेवला जावा या मागण्या मान्य न झाल्यास संपूर्ण राज्यभरात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशाराही महासंघाच्या वतीने सरकारला देण्यात आला.

## उरण तालुक्यात खरिपाच्या भात पेरणीला वेग

**दैनिक युंवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण तालुक्यात उरण पूर्व विभागातील चिरनेर, कळंबुसरे, मोठीजुई, सारडे, वशेणी या गावांसह नागाव, केगाव, साई, दिघाटी, खारपाडा या भागात व इतरत्र खरिपाच्या पेरणीला वेग आला आहे. सध्या पेरणी योग्य पाऊस बरसल्यामुळे, गेले दोन दिवस शेतकरी भात बियाणे पेरणीच्या कामात व्यस्त आहेत

या भागातील पारंपारिक बैलांचे नांगर आता नामशेष झाले असल्यामुळे शेतकरी पावर टिलरच्या साह्याने नांगरणी करत आहेत. सध्या शेतकरी शेतीच्या मशागतीच्या आणि पेरणीच्या



कामात मग्न असल्याचे दिसून येत आहे. पावसाने उघडीप दिल्यामुळे शेतकऱ्यांची पेरणीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. या भागात औद्योगिककरणामुळे गोदामांचे जाळे विणले आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना वाढत्या महागाईमुळे बी- बियाणे, खते व शेतमजूर परवडत नसल्यामुळे तालुक्यातील शेत जमिनीचे लागवडीखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. सध्या जया, मसूरी, रत्ना, सुवर्णा, रत्नागिरी, इंद्रायणी अशा विविध जातीच्या वाणांची शेतकऱ्यांनी भात पेरणी केली आहे.

# पळस्पे–कोन उड्डाणपूल व रस्ते प्रकल्पातील अडचणींवर भाजप युवा नेते अतुल घरत यांची आक्रमक भूमिका

## "शून्य अपघात" अभियानासह प्रकल्पग्रस्तांना न्याय व सुरक्षित वाहतुकीवर भर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : उरण विधानसभा मतदारसंघातील पनवेल तालुक्यात सुरू असलेल्या पळस्पे–कोन उड्डाणपूल व रस्ते प्रकल्पाच्या कामामध्ये प्रकल्पग्रस्तांना मोबदला, वाहतूक नियोजन, सुरक्षा उपाययोजना आणि कामातील विलंब यांसारख्या गंभीर प्रश्नांमुळे अडथळे निर्माण होत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर भाजप युवा नेते अतुल घरत यांनी आक्रमक भूमिका घेत संबंधित प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

प्रकल्पाच्या (पळस्पे )0 ते 1700(कोन) रोड मार्क या टप्प्यात अनेक ठिकाणी प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींचा मोबदला प्रलंबित असल्याने विकासकामांचा वेग मंदावला आहे. महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) आणि MMRDA यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे नियोजनात त्रुटी असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू असल्याचे समजताच अतुल घरत यांनी संबंधित माहिती आमदार महेश बालदी यांना देत त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष बैठक घेणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, फेब्रुवारी ते जून २०२६ या कालावधीत या मार्गावर झालेल्या अपघातांमध्ये दोन निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्ते सुरक्षेतेच्या दृष्टिकोनातून तसेच दुर्घटनांबाबत स्थानिक नागरिकांनी रायगड जिल्हा परिषद सदस्या हर्षदा अतुल घरत यांच्या



> **पळस्पे – कोन ट्राफिक कमी करण्यासाठी एक्सप्रेस उड्डाणपूला हा पूल जोडणे महत्वाचे होते .कोन वाहतूक पोलीस चौकी ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे . पळस्पे उड्डाणपूल थेट द्रुतगती महामार्गाशी जोडला जात नसून तो जुन्या मुंबई–पुणे महामार्गाला रसायनी सावळा मार्गाला जोडला जात आहे ज्याने भविष्यातील वाहतूक नियोजनाबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे**
>
> **महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ (पत्रकार साबीर शेख)**

कार्यालयात तक्रारी दाखल करीत पावसाळ्यातील सांडपाणी व वाहतूक कोंडी बाबतीत माहिती दिली.

या तक्रारींची दखल घेत २६ जून रोजी भाजप युवा नेते अतुल घरत ,गोरखनाथ धुमाळ,रवी शेळके,हरीश घरत,पत्रकार साबीर शेख, स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि शिष्टमंडळासह वाहतूक नियंत्रण विभागाचे वरिष्ठ पोलीस अधिकारी सकपाळ तसेच गोवर कन्स्ट्रक्शनच्या प्रतिनिधींसोबत पळस्पे ते कोन मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणीदरम्यान अपघातप्रवण ठिकाणे, धोकादायक वळणे, क्रॉसिंग, वाहतूक नियंत्रण, पावसाच्या पाण्याचा निचरा, सूचना फलक, गटारे, यू-टर्न आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या. तसेच प्रकल्पग्रस्त आणि विकासकामांमधील प्रलंबित प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली.

डी-मार्ट परिसर हा प्रकल्पाचा 'झिरो पॉइंट' मानण्यात आला असून तेथून कोन चौकीपर्यंत १७०० रोड मार्क निश्चित करण्यात आले आहेत. या दरम्यान भारत पेट्रोलियमलगतचा वैभव पेट्रोल पंप, ट्रेलरची वर्दळ, झाडे, शेतकऱ्यांचा मोबदला, कार शोरूम, यू-टर्न, गटारे आणि विविध क्रॉसिंग ही वाहतुकीसाठी अडचणीची ठिकाणे असल्याचे निदर्शनास आले असता सर्व संबंधितांना अतुल म्हात्रे यांनी संपर्क करीत सकारात्मक मार्ग काढण्याचे यशस्वी प्रयास केल्याने भविष्यात कामाला गती वाढेल अशी अपेक्षा दिसली.

सर्वसामान्य जनतेला वेटीस धरू नये, रस्ते सुरक्षा नियम पाळावे ,मोबदला द्यावा अश्या या सर्व गंभीर मुद्द्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ, प्रकल्पग्रस्त, संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांची संयुक्त बैठक घेण्यात येणार आमच्या साठी "विकास महत्त्वाचा आहे; मात्र तो जीवाशी खेळून होऊ नये. प्रकल्पग्रस्तांना न्याय, सुरक्षित रस्ते आणि शून्य अपघात हेच आमचे ध्येय आहे,रस्ते विकासाला महत्वाचे त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे " अशी भूमिका अतुल घरत यांनी यावेळी मांडली.

# सामाजिक न्यायदिनानिमित्त छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा जागर

## सामाजिक समतेची पेरणी म्हणजेच सामाजिक न्यायदिन – प्रा. डॉ. सुभाष राऊत

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा सिद्धार्थ धंदरे जिल्हा प्रतिनिधी** : सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासाचा विचार प्रत्यक्ष कृतीतून रुजविणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे आधुनिक भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार होते. देश वारंवार गुलाम होण्यामागील सामाजिक विषमता ओळखून स्त्रिया, भटक्या-विमुक्त जाती आणि अस्पृश्य समाज मुख्य प्रवाहात आल्याशिवाय देशाची खरी प्रगती होणार नाही, ही दूरदृष्टी शाहू महाराजांनी मांडली होती. त्यामुळेच "सामाजिक न्यायदिन म्हणजे खऱ्या अर्थाने सामाजिक समतेची पेरणी", असे प्रतिपादन प्रा. डॉ. सुभाष राऊत यांनी केले.

एस.पी.एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयात सामाजिक न्यायदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

प्रा. डॉ. राऊत यांनी आपल्या व्याख्यानात शाहू महाराजांच्या कार्याचा



सविस्तर आढावा घेताना सांगितले की, सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी केवळ विचार मांडले नाहीत, तर त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. समाजातील जातिभेद कमी करण्यासाठी त्यांनी आपल्या चुलत बहिणीचा आंतरजातीय विवाह होळकर घराण्यात घडवून आणला. अस्पृश्यता निर्मूलनासाठी मातंग समाजातील व्यक्तीला चहाचे हॉटेल सुरू करून दिले आणि स्वतः त्या हॉटेलमध्ये ग्राहक म्हणून जाऊन सामाजिक समतेचा आदर्श निर्माण केला.

याशिवाय कैकाडी समाजातील गुणवंत मुलाची प्रतिभा ओळखून त्याला उत्कृष्ट कुस्तीपटू बनविण्यासाठी प्रोत्साहन दिले. पारधी समाजावरील गुन्हेगारीची छाप दूर करण्यासाठी त्यांनी विविध सामाजिक उपाययोजना राबवल्या. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

प्रा. डॉ. राऊत पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील विलक्षण बुद्धिमत्ता आणि नेतृत्वगुण शाहू महाराजांनी अत्यंत लवकर ओळखले. ते केवळ वंचित समाजाचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे भवितव्य घडविणारे युगपुरुष ठरतील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या परदेशातील उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत केली. ही दूरदृष्टी भारतीय समाजव्यवस्थेच्या परिवर्तनासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली.

शिक्षण आणि नोकरीच्या संधींमध्ये वंचित घटकांना न्याय मिळावा या उद्देशाने शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सन १९०२ मध्ये ५० टक्के आरक्षणाची ऐतिहासिक अंमलबजावणी केली. सामाजिक न्यायाच्या दिशेने उचललेले हे पाऊल भारताच्या सामाजिक इतिहासातील मैलाचा दगड ठरल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एस.पी. एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सामाजिक न्यायाची संकल्पना आजच्या काळात अधिक व्यापकपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज व्यक्त केली.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. मनीष पालवे यांनी केले. सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांचा वारसा जपण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

# मोहरमच्या निमित्ताने ग्रीन टायगर संघटना, मुरुडतर्फे नागरिकांना शरबत वाटप



**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मोहरमच्या निमित्ताने ग्रीन टायगर संघटना, मुरुड यांच्या वतीने सर्व धर्मीय नागरिकांसाठी शरबत वाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. मोहरमच्या पार्श्वभूमीवर सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या उपक्रमात रस्त्याने ये-जा करणारे नागरिक, प्रवासी तसेच विविध समाजातील नागरिकांना शरबताचे वाटप करण्यात आले. समाजात सलोखा, परस्पर सन्मान आणि एकोप्याची भावना अधिक दृढ व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.या उपक्रमात सद्दाम तंबोली, बाबा बागवान, महेबूब सय्यद, सलीम शेख, वाहेद शेख, असद बागवान, ताजोदिन, वाजिद तंबोली, सलमान सय्यद, मुजाहिद बागवान, फरीद पठाण, समीर सय्यद आदींनी सक्रिय सहभाग घेतला.यावेळी मुरुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील सोजर अंधारे तसेच पोलीस अंमलदार सूर्यवंशी यांनी उपक्रमाला भेट देऊन आयोजकांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. उपस्थित नागरिकांनीही ग्रीन टायगर संघटनेच्या या उपक्रमाचे स्वागत करत समाजात बंधुभाव आणि सलोखा जपण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

# अकोट येथे 'लवंगी फटाका' गीताचे शानदार लोकार्पण

## चेतन जाधव यांच्या कलाकृतीला रसिकांची पसंती

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा सिद्धार्थ धंदरे जिल्हा प्रतिनिधी** : विदर्भातील नवोदित आणि प्रतिभावान कलाकारांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या व्हिडिएटिक्स युट्युब चॅनेलवर प्रदर्शित झालेल्या 'लवंगी फटाका' या नव्या मराठी गीताचे अकोट येथे उत्साहपूर्ण वातावरणात लोकार्पण करण्यात आले.

बुलढाणा जिल्ह्याचे सुपुत्र, गीतकार, संगीतकार व दिग्दर्शक चेतन जाधव यांनी या गीताचे लेखन, संगीत दिग्दर्शन आणि दिग्दर्शन केले असून त्यांच्या बहुआयामी कलागुणांची पुन्हा एकदा प्रचिती या गीतातून आली आहे. विविध संगीत प्रकल्पांमधून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केलेल्या चेतन जाधव यांनी महाराष्ट्रभर अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये परीक्षक म्हणूनही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. एक कुशल संगीत दिग्दर्शक म्हणून त्यांची राज्यभर विशेष ओळख आहे.

या गीताचे लोकार्पण ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, कवी, शाहीर व गायक अनिलजी वानखडे तसेच सामाजिक कार्यकर्त्या, समाजसेविका व रमाई ब्रिगेड विदर्भ नेत्या सुवर्णाताई वानखडे यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाला मंजुताई वानरे, चंद्रशेखर धुंदे, ज्योतीताई बनसोडे, मीराताई धुंदे, वनिताताई




भाटे, मेहुल व्यास यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व कलाकार उपस्थित होते.

गीतामध्ये सुगत पळसपगार, जीविका आणि हर्षल काटोले यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. या गीताच्या निर्मितीची धुरा कोमल पळसपगार यांनी सांभाळली असून व्हिडिएटिक्स मीडियाचे प्रोडक्शन असिस्टंट जय कोरडे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावणी वानखडे यांनी केले. चेतन जाधव यांनी प्रास्ताविकातून गीत निर्मितीचा प्रवास उलगडून सांगितला, तर सुगत पळसपगार यांनी उपस्थितांचे आभार मानले.'लवंगी फटाका' हे गीत प्रदर्शित होताच रसिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, या गीतामुळे बुलढाणा जिल्ह्यातील कलाकारांच्या प्रतिभेला नवे व्यासपीठ मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सीसीटीव्हीलाही चकवा देणारा 'कंबलवाला' अखेर गजाआड !

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम गेल्या तब्बल तीन वर्षांपासून वाशिम शहरातील व्यापारी आणि नागरिकांच्या झोपेचे खोबरे करणारा, सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चेहरा पूर्णपणे झाकून दुकाणफोड्या करणारा 'कंबलवाला' अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. हिंगोली जिल्ह्यातील खरबी येथील खेत्राजी माणिक पवार (वय ५२) या अट्टल दुकाणफोड्याला वाशिम शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या (डीबी पथक) पथकाने अत्यंत शिताफीने जेरबंद केले. आरोपीकडून रोख रकमेसह एकूण १ लाख १८ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्याने शहरातील सात मोठ्या दुकाणफोड्यांची कबुली दिल्याने व्यापारी वर्गाने सुटकेचा निश्वास सोडला आहे.

विशेष म्हणजे, आरोपी इतका चलाख होता की तो कधीही मोबाईलचा वापर करत नव्हता. त्यामुळे त्याचा तांत्रिक मागोवा घेणे पोलिसांसाठी अशक्यप्राय ठरत होते. गुन्हा करण्यापूर्वी तो हिंगोलीहून वैद्यकीय उपचाराच्या बहाण्याने वाशिममध्ये येत असे. दिवसभर शहरातील विविध भागांत फिरून बंद दुकाने आणि परिसराची रेकी करत असे. त्यानंतर रात्रीच्या वेळी अंगावर घोंगडी (कंबल) ओढून संपूर्ण चेहरा झाकत दुकाणफोड्या करत असल्याने सीसीटीव्ही फुटेजमध्ये त्याचा चेहरा स्पष्ट दिसत नव्हता. त्यामुळे पोलिसांकडे




त्याच्या केवळ डोळ्यांची ठेवण, हातातील घड्याळ आणि चालण्याची विशिष्ट शैली एवढेच धागेदोरे उपलब्ध होते.

आरोपीने पाटणी चौक, अकोला रोड, रिसोड नाका, हिंगोली रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक आणि लाखाळा परिसरातील राठी बाजार, रेणुकाई पेंट्स, इंगोले ॲग्रो सर्व्हिस सेंटर, बदलाणी डेव्हलपर्स, तिरुपती मार्बल्स, स्वराज ट्रॅक्टर शोरूम आणि ओम ट्रेडर्स येथे दुकाणफोड्या केल्याची कबुली पोलिसांना दिली आहे.

या संपूर्ण प्रकरणाला नाट्यमय वळण मिळाले ते काही दिवसांपूर्वी. वाशिम शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस शिपाई अजित खंडाळकर हे सकाळी आपल्या दोन लहान मुलांना घेऊन पाटणी चौक परिसरात आंबे खरेदीसाठी गेले होते. यावेळी दुकानाच्या ओट्यावर बसलेल्या एका संशयित व्यक्तीकडे त्यांची नजर गेली. सीसीटीव्हीमधील संशयिताचे डोळे आणि हातातील घड्याळ त्यांच्या स्मरणात असल्याने त्यांनी क्षणात त्या व्यक्तीला ओळखले. संशयिताला नाव विचारताच तो गोंधळला. त्याची बॅग तपासण्याचा प्रयत्न होताच त्याने खंडाळकर यांना जोराचा धक्का देत घटनास्थळावरून पळ काढला.

प्रसंगावधान राखत पोलीस शिपाई अजित खंडाळकर यांनी सर्वप्रथम आपल्या दोन्ही चिमुकल्या मुलांना सुरक्षित ठिकाणी बसवले आणि त्यानंतर कोणतीही पर्वा न करता अट्टल चोराच्या मागे धाव घेतली. महात्मा फुले भाजी मार्केट परिसरात नागरिकांच्या मदतीने त्यांनी आरोपीला शिताफीने पकडले. पोलिसी चौकशीदरम्यान आरोपीने शहरातील अनेक दुकाणफोड्यांची कबुली दिली.

आरोपीच्या अंगझडतीत आणि बॅगेतून दुकाणफोडीसाठी वापरली जाणारी लोखंडी टॉमी, मोठा पेचकस, छोटी बॅटरी, टोपी, स्कार्फ, गुन्ह्यावेळी अंगावर ओढण्यासाठी वापरली जाणारी घोंगडी, तसेच ४० हजार ७९० रुपये रोख, चोरीचे शिक्के, चोरीच्या पैशातून खरेदी केलेली तीन महागडी घड्याळे, एक मोबाईल आणि एक रेंजर सायकल असा एकूण १ लाख १८ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम ३३४(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही उल्लेखनीय कारवाई वाशिमचे पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे (पाटील), अप्पर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वाशिम शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी संजय चौधरी, सहायक पोलीस निरीक्षक जितेंद्र आडोळे, पोलीस अंमलदार राजेश राठोड, अष्टसिद्ध नप्ते, नंदकिशोर कुऱ्हाडे, विशाल इंगळे, किशोर खंडारे तसेच पोलीस शिपाई अजित खंडाळकर यांनी या कारवाईत मोलाची भूमिका बजावली.

सीसीटीव्हीला चकवा देणाऱ्या 'कंबलवाला'चा अखेर पोलिसांनी केलेला पर्दाफाश हा वाशिम पोलिसांच्या चिकाटी, सूक्ष्म तपास आणि कर्तव्यदक्षतेचा उत्कृष्ट नमुना ठरला असून, विशेषतः पोलीस शिपाई अजित खंडाळकर यांनी दाखवलेले धाडस, प्रसंगावधान आणि कर्तव्यनिष्ठा यामुळे त्यांच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# एका अपयशाने आयुष्य ठरत नाही! जिद्दीनेच इतिहास घडतो!

## शुभम गारशेटवाडची प्रेरणादायी यशोगाथा"

आजच्या स्पर्धेच्या युगात अनेक विद्यार्थ्यांना असे वाटते की, एका परीक्षेतील अपयश म्हणजे आयुष्य संपले. एखादा विषय गेला, कमी गुण मिळाले किंवा अपेक्षित यश मिळाले नाही, तर अनेक जण स्वतःलाच कमी लेखू लागतात. पण इतिहास साक्षी आहे की, अपयश हे यशाचे विरुद्ध नसून यशाकडे जाणारी पहिली पायरी असते. ज्या व्यक्ती संघर्षाला सामोरे जातात, अपयशातून शिकतात आणि पुन्हा उभे राहतात, त्यांच्याच नावाने एक दिवस इतिहास लिहिला जातो.

"सोनं जितकं अग्नीत तापतं, तितकंच ते अधिक तेजस्वी होतं." हे वाक्य महागाव (ता. उमरखेड, जि. यवतमाळ) येथील सर्वसामान्य कुटुंबातील शुभम गारशेटवाड यांच्या प्रवासाला अगदी तंतोतंत लागू पडते.

शुभमचा जन्म एका अत्यंत सामान्य कुटुंबात झाला. मोठी आर्थिक परिस्थिती नव्हती, शहरातील सुविधा नव्हत्या, मार्गदर्शनाची साधनं मर्यादित होती; पण त्याच्याकडे एक गोष्ट होती आणि ती म्हणजे मोठी स्वप्नं पाहण्याचं धाडस. कारण माणसाला मोठं बनवते ती त्याची परिस्थिती नसते, तर त्याची विचारसरणी आणि जिद्द असते.

दहावीच्या परीक्षेदरम्यान शुभम एका विषयात अनुत्तीर्ण झाला. अनेक विद्यार्थी अशा प्रसंगी स्वतःवरचा विश्वास गमावतात. काही जण शिक्षणच सोडून देतात. पण शुभमने अपयशाला पराभव मानलं नाही. त्याने स्वतःला एकच प्रश्न विचारला — "मी इथेच थांबणार की पुन्हा नव्याने सुरुवात करणार?" उत्तर त्याने कृतीतून दिलं.

दुप्पट मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्वतःवरचा अढळ विश्वास यांच्या जोरावर त्याने बारावीच्या परीक्षेत तब्बल ८७ टक्के गुण मिळवले. त्या एका यशाने त्याचं आयुष्य बदलायला सुरुवात झाली.



"अपयश तुम्हाला थांबवत नाही; हार मानण्याचा निर्णय तुम्हाला थांबवतो."

ग्रामीण भागातून पुण्यासारख्या मोठ्या शहरात जाऊन शिक्षण घेणं ही कोणत्याही विद्यार्थ्यासाठी मोठी गोष्ट असते. नवीन वातावरण, नवीन लोक, नवीन संस्कृती, स्पर्धा आणि स्वतःला सिद्ध करण्याची धडपड — हे सर्व स्वीकारण्यासाठी प्रचंड आत्मविश्वास लागतो. पण शुभमने या प्रत्येक आव्हानाला संधी मानलं.

त्याची निवड देशातील प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक अशी ओळख असलेल्या फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे झाली. आज तो तेथे दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असून स्वतःचं भविष्य घडवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

हा प्रवास केवळ एका विद्यार्थ्याचा नाही. हा त्या प्रत्येक ग्रामीण विद्यार्थ्याचा प्रवास आहे ज्याला वाटतं की, "मी छोट्या गावातून आहे म्हणून माझी स्वप्नंही छोटी असली पाहिजेत." शुभमची कहाणी हे सिद्ध करते की स्वप्नांना गावाचं बंधन नसतं आणि यशाला आर्थिक परिस्थितीची अट नसते.

"जन्म परिस्थितीत होतो; पण ओळख कर्तृत्वाने निर्माण होते."

आज सोशल मीडियावर आपण यश पाहतो; पण त्या यशामागील संघर्ष, अश्रू, अपमान, अपयश आणि हजारो दिवसांची मेहनत पाहत नाही. शुभमच्या यशामागेही अशीच न दिसणारी संघर्षाची कहाणी दडलेली आहे.

आज अनेक विद्यार्थी एका अपयशामुळे नैराश्यात जातात. पण शुभमचा प्रवास प्रत्येकाला सांगतो की, आयुष्य एका निकालावर थांबत नाही.

एक परीक्षा, एक विषय किंवा एक अपयश तुमचं संपूर्ण भविष्य ठरवू शकत नाही.

"थेंबे थेंबे तळे साचे."

यश एका दिवसात मिळत नाही. प्रत्येक दिवसाची मेहनत, प्रत्येक अपयशातून घेतलेला धडा आणि प्रत्येक वेळी पुन्हा उभं राहण्याची हिंमत — यांची बेरीज म्हणजेच यश.

महागावसारख्या छोट्याशा गावातून पुण्यापर्यंतचा शुभमचा प्रवास आज हजारो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. त्याने सिद्ध करून दाखवलं की, गरीब घरात जन्म घेणं हा दोष नाही; पण स्वतःच्या स्वप्नांवर विश्वास न ठेवणं हीच खरी हार आहे.

आज त्याचं यश केवळ त्याच्या कुटुंबाचं नाही, तर संपूर्ण उमरखेड तालुका आणि यवतमाळ जिल्ह्याचा अभिमान आहे.

अशा विद्यार्थ्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील अनेक मुलांच्या डोळ्यांत नवीन स्वप्नं जागी होतात.

"आकाशाला गवसणी घालणारे लोक पंख घेऊन जन्माला येत नाहीत; ते जिद्दीने स्वतःचे पंख घडवतात."

आजच्या तरुणांना शुभमच्या प्रवासातून एकच संदेश मिळतो — परिस्थिती कितीही कठीण असली, साधनं कितीही कमी असली, अपयश कितीही मोठं असलं तरी स्वतःवरचा विश्वास कधीही सोडू नका. कारण...

"सूर्य रोज मावळतो, पण दुसऱ्या दिवशी पुन्हा उगवतो. माणसानेही अपयशानंतर तितक्याच ताकदीने पुन्हा उभं राहायला शिकलं पाहिजे."

**शेवटी एवढंच...**


"ज्यांच्या डोळ्यांत स्वप्नं असतात, त्यांच्याच पायांत संघर्षाची ताकद असते. आणि जे संघर्षावर प्रेम करतात, त्यांच्याच यशावर एक दिवस जग टाळ्या वाजवतं."

---

# घाटंजीत भटक्या कुत्र्यांचा हैदोस; चिखलवर्धा येथील ४ वर्षांच्या बालकाच्या मृत्यूनंतर प्रशासनाविरुद्ध संताप!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : घाटंजी तालुका आणि शहरात सध्या भटक्या कुत्र्यांनी प्रचंड धुमाकूळ घातला असून यामुळे निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. अत्यंत दुर्दैवी बाब म्हणजे अवघ्या आठ दिवसांपूर्वी घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा या गावात एका चार वर्षांच्या निष्पाप बालकाचा कुत्रा चावल्याने मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि हळहळ व्यक्त होत आहे. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या सुळसुळाटामुळे लहान मुलांना



घराबाहेर पडणे कठीण झाले असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत आज 'जे' यांनी संबंधित विभागांना आणि प्रशासनाला लेखी निवेदन सादर केले आहे. चिखलवर्धा येथील बालकाचा झालेला मृत्यू आणि लोकांवर होणारे हल्ले लक्षात घेता प्रशासनाने आता कोणतीही टाळाटाळ न करता तात्काळ ठोस पावले उचलावीत आणि या समस्येवर तातडीने कारवाई करावी, अशी आक्रमक मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शहरातील परिस्थितीही अशीच बिकट असून नुकतीच जलाराम मंदिराजवळील एकविरा कॉम्प्युटर परिसरात अमोल ढगले या युवकावर कुत्र्यांच्या कळपाने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. घाटंजी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल पुंडे यांनी सांगितले की, रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी अँटी-रेबीज इंजेक्शन उपलब्ध असले तरी, जखम मोठी असल्यास लागणारे 'रेबीज इम्युनोग्लोबुलिन' इंजेक्शन उपलब्ध नसते. त्यामुळे गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी यवतमाळला पाठवावे लागते, ज्यामुळे रुग्णांचा त्रास अधिकच वाढतो.

नागरिकांनी यापूर्वी तक्रारी केल्यावर प्रशासनाकडून निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याचे सांगून वेळ मारून नेली जात आहे. परंतु "टेंडर निघेपर्यंत नागरिकांनी कुत्र्यांचे हल्ले सहन करायचे का आणि आणखी निष्पापांचे बळी जाऊ द्यायचे का?" असा संतप्त सवाल आता जनता विचारत आहे. आज सादर झालेल्या निवेदनावर प्रशासनाने त्वरित कारवाई करून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

---

# ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थी निधी 3 लाख व शहरी भागातील घरकुल लाभार्थी यांच्या निधीत 5 लाख वाढ करा

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : मुंबई-ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थी यांच्या निधीत 3 लाख व शहरी भागातील घरकुल निधीत 5 लाख रुपये वाढ करण्यात यावे याकरिता दिनांक 25 जून 2026 ला ग्रामविकास मंत्री जय कुमार गोरे यांच्या मुंबई येथील मंत्रालयात निवेदन देण्यात आले. याबाबत सविस्तर वृत्त असे की दिवसेंदिवस महागाई वाढत आहे त्यामुळे सिमेंट खर्च ,रेती खर्च ,लोहा खर्च ,बद्री, मजुरी खर्च ,मिस्त्री कर्ज, पाणी खर्च व अन्य साधन सामग्रीचे भाव दिवसेंदिवस वाटत आहे .मागील २५ वर्षांपासून साधनसामग्रीत चारपट वाढ झालेली आहे .त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बनविताना तारेवरची कार्यकर्ती कसरत करावी लागते. बरेच लोक घरकुल मंजूर होऊन सुद्धा बांधू शकत नाही .त्यामुळे सावकाराकडून कर्ज

## प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेच्या वतीने ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांना मंत्रालयात निवेदन




घ्यावे लागते .त्यामुळे ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना तीन लाख व शहरी भागातील घरकुल लाभार्थ्यांना पाच लाख रुपये निधीत वाढ करण्यात यावे.

---

# स्व. रावसाहेब निवासी मतिमंद विद्यालय देवळी शाळेला दिशा अभियानातर्फे दिशा इम्पलेमेंटेशन शाळा पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव :( यवतमाळ)** : दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्व. रावसाहेब निवासी मतिमंद विद्यालय देवळी जिल्हा वर्धा या शाळेला दिशा अभियाना तर्फे दिशा इम्प्लिमेंटेशन शाळा म्हणून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार माननीय जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती प्रतिभा भागवतकर मॅडम तसेच सहाय्यक सल्लागार दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय वर्धा सोनाली शिंदे मॅडम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी शाळेच्या वतीने शाळा प्रमुख जीवन टाले, ज्ञानेश्वर काळे आणि राजाभाऊ संदलवार यांनी पुरस्कार स्वीकारला. या गौरवामुळे संस्थेच्या कार्याची जिल्हास्तरावर दखल घेतली गेली असून शाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर शाळेचे संस्थापक श्री यादव सूर्यवंशी सर यांनी सर्व शिक्षक, कर्मचारी व सहकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या समर्पित सेवाभावाचे कौतुक केले. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण, संगोपन व पुनर्वसनासाठी सर्वांनी केलेल्या अथक परिश्रमामुळेच हा सन्मान मिळाल्याचे त्यांनी सांगितले.या पुरस्कारामुळे विद्यालयाच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून भविष्यातही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार संस्थेने व्यक्त केला.

---

# गोंदिया जिल्हा काँग्रेसचे नवनियुक्त अध्यक्ष अमर वराडे यांचा आमगाव तालुका दौरा; कार्यकर्त्यांशी संवाद साधून संघटन बळकटीकरणावर भर

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांनी आपला पदभार स्वीकारल्यानंतर, जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी आणि पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी आमगाव तालुक्यात जनसंपर्क व कार्यकर्ता भेट दौरा आयोजित केला. या दौऱ्याच्या माध्यमातून त्यांनी तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.

**गावागावात जाऊन साधला जनसंपर्क**

या दौऱ्यात जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांनी ठाणा, जांभूळटोला, अंजोरा, बोरकन्हार, आमगाव नगर परिषद क्षेत्र, शंभूटोला, कट्टीपार, घाटटेमनी, करंजी,



कातुर्ली आणि सितेपार या गावांचा दौरा केला. प्रत्येक ठिकाणी त्यांनी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करून पक्ष संघटनेच्या विस्ताराचा आढावा घेतला.

आमगाव नगर परिषद क्षेत्रात खासदार नामदेवराव किरसान यांच्या जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत आगामी राजकीय घडामोडी, संघटनात्मक कार्यक्रम आणि जनतेच्या ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**डरो मत'चा संदेश आणि काँग्रेसची ध्येयधोरणे**

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अमर वराडे म्हणाले की, "जिल्हाध्यक्ष म्हणून माझी जबाबदारी आहे की मी लोकांपर्यंत आणि त्यांच्या समस्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता, राहुल गांधींचा 'डरो मत' हा संदेश घेऊन आत्मविश्वासाने काम करावे. जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि काँग्रेसची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे".

**उपस्थितांची उपस्थिती**

या दौऱ्याच्या निमित्ताने काँग्रेस पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. यावेळी जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांच्यासह प्रदेश सचिव पी. जी. कटरे, तालुकाध्यक्ष संजय बहेकार, खासदार प्रतिनिधी दुष्यंत किरसान, जिल्हा परिषद सदस्य छबूताई उके, महिला जिल्हा उपाध्यक्ष प्रभादेवी उपराडे, शहराध्यक्ष देवकांत बहेकार, परिवहन सेलचे जिल्हा अध्यक्ष बाबा मिश्रा, दिलीप टेंभरे, यादोराव भोयर, रामेश्वर श्यामकुवर, जगदीश चुटे, भोला गुप्ता, राधाकिसन चुटे, पिंकेश शेंडे, राधेलाल रहांगडाले, राहुल चुटे, तपीस परिहार, समीर खान यांच्यासह मोठ्या संख्येने काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन भोला गुप्ता यांनी केले, तर आभार प्रदर्शन शहराध्यक्ष देवकांत बहेकार यांनी केले.

अमर वराडे यांच्या या दौऱ्यामुळे आणि त्यांच्या थेट संवादामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जेचे संचार झाले असून, आगामी काळात काँग्रेस पक्ष अधिक ताकदीने जनतेच्या प्रश्नांसाठी उभा राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

---

# लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना थेट भिडतो तो खरा पत्रकार — डॉ. नरेंद्र जाधव

## जयंत माईणकर, ज्ञानदा कदम, दिगंबर सावंत, संदीप पागडे, रामकृष्ण खांदारे, राजेंद्र साळसकर मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : सामान्य लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना थेट भिडतो तोच पत्रकार. देशाला भिडणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांना थेट सामोरे जाणारी मराठी पत्रकारितेची प्रदीर्घ परंपरा तुम्ही कायम ठेवली आहे आणि यापुढेही ठेवाल, अशा शब्दांत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व लेखक पद्मश्री डॉ. नरेंद्र जाधव यांनी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पुरस्कारांच्या मानकऱ्यांचे कौतुक केले.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यात डॉ. नरेंद्र जाधव बोलत होते. यावेळी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनातील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहास संघाचे माजी अध्यक्ष कृ. पां. सामक यांचे नाव देण्यात आले, तसेच नूतनीकरण करण्यात आलेल्या सभागृहाचे उद्घाटनही डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, राजेंद्र हुंजे, खजिनदार जगदीश भोवड, विश्वस्त देवदास मटाले, अजय वैद्य, पदसिद्ध सदस्य नरेंद्र वाबळे आणि कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक तसेच यूएनआय वृत्तसंस्थेचे महाराष्ट्रातील माजी ब्युरो चीफ जयंत माईणकर, एबीपी माझाच्या वृत्तनिवेदिका ज्ञानदा कदम, महाराष्ट्र टाइम्सचे माजी मुद्रितशोधक दिगंबर सावंत, दैनिक सामनाचे वृत्तछायाचित्रकार संदीप पागडे, दैनिक नवराष्ट्रचे रामकृष्ण खांदारे आणि पत्रकार राजेंद्र साळसकर यांना यावेळी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कारांचे यंदाचे हे ३६ वे वर्ष आहे. रोख रुपये दहा हजार, सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

पत्रकार संघाने लोणावळा येथे उभारलेल्या विश्रामधामासह पत्रकारांसाठी मोफत अपघाती विमा तसेच पत्रकार भवनातील सभागृहाचे नूतनीकरण असे विविध उपक्रम संघाच्या कार्यकारिणीने राबविले. पत्रकारांच्या हितास सर्वोच्च प्राधान्य देणारी देशातील ही सर्वोच्च संस्था असल्याचा अभिमान अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केला.

माईणकर यांनी या पुरस्कारामुळे माझ्या प्रदीर्घ कारकिर्दीची पत्रकार संघाने दखल घेतल्याबद्दल आनंद व्यक्त केला. तर एबीपी माझाच्या अँकर ज्ञानदा कदम यांनी, ‘याच पत्रकार संघातून मी पत्रकारितेचे धडे शिकले. आज त्याच संस्थेने मला निवेदिकेसाठीचा पहिला पुरस्कार द्यावा, हा मी माझा बहुमान समजते,’ अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी कार्यकारी संपादक प्रसाद मोकाशी यांनी संपादित केलेल्या लोणावळा विश्रामधामवरील विशेषांकाचे डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच या विशेषांकासाठी विशेष परिश्रम घेणाऱ्या प्रसाद मोकाशी यांच्यासह स्नेहल मसुरकर, दयानंद जाधव आणि आत्माराम नाटेकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सदानंद खोपकर यांच्या नव्या पुस्तकाचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले. पत्रकार संघाच्या युट्यूबद्वारे लाखोंचे उत्पन्न मिळवून देणाऱ्या उपक्रमाची यशस्वी हाताळणी करणारे कार्यकारिणी सदस्य राजू खाडे आणि स्वप्नेश माळी यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ सदस्यांना यावेळी सन्माननीय सदस्यत्व देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेंद्र शिर्वेâ यांनी तर सूत्रसंचालन राजेंद्र हुंजे यांनी केले.

**पुरस्काराचे यंदाचे मानकरी पुढीलप्रमाणे आहेत :**

त् शोधपत्रकारितेसाठी दिला जाणारा ‘पद्मश्री यमुनाताई खाडिलकर स्मृती पुरस्कार’ : रामकृष्ण खांदारे (दैनिक नवराष्ट्र)

त् वृत्तपत्रात काम केलेल्या ज्येष्ठ मुद्रितशोधकास दिला जाणारा ‘कविवर्य प्रा. भालचंद्र खांडेकर पुरस्कार’ : श्री. दिगंबर सावंत (महाराष्ट्र टाइम्समधून निवृत्त)

त् सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रदीर्घ कार्य केल्याबद्दल दिला जाणारा ‘समतानंद अनंत हरि गद्रे पुरस्कार’ : श्री. राजेंद्र साळसकर

त् वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून प्रदीर्घ कामगिरीबद्दल दिला जाणारा ‘अॅड. अधिक शिरोडकर पुरस्कृत तोलाराम कुकरेजा वृत्तछायाचित्रकार पुरस्कार’ : श्री. संदीप पागडे (दैनिक सामना)

त् ज्येष्ठ पत्रकार/संपादकास दिला जाणारा ‘युगारंभकार, सर्वोदयी कार्यकर्ते मधुसूदन सीताराम रावकर स्मृती पुरस्कार’ : श्री. जयंत माईणकर (राजकीय विश्लेषक आणि यूएनआय वृत्तसंस्था, महाराष्ट्राचे माजी ब्युरो चीफ)

त् महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट निवेदक किंवा सूत्रसंचालकाला दिला जाणारा कै. शरद वैद्य स्मृती पुरस्कार : ज्ञानदा कदम (एबीपी माझा)

# वैज्ञानिकांनी जागतिक पातळीवर पाऊस पाडण्याचे तंत्रज्ञान विकसित करावे :– माजी आ. भीमराव धोंडे

## वाढत चाललेले तापमान कमी करण्यासाठी वृक्षारोपण करा :– मा.आ. बाळासाहेब आजबे

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : जागतिक पातळीवर युद्धासाठी नवनविन संशोधन केले जाते त्याप्रमाणे शास्त्रज्ञांनी पाऊस पाडण्याचे तंत्रज्ञान विकसित करावे असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले. पर्जन्यवृष्टीसाठी महाजलाभिषेक व पर्जन्ययागाचा निश्चित फायदा होईल. प्रत्येक वर्षी वाढत चाललेले तापमान कमी करण्यासाठी प्रत्येकाने वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी केले.

माजी आ. भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यासह राज्यात सर्वत्र चांगला पाऊस पडावा, शेतकऱ्यांमध्ये समृद्धी निर्माण व्हावी याकरिता कडा येथील महेश मंदिरात महाजलाभिषेक

व पर्जन्ययाग यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महेश कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल,अभयराजे धोंडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, उपसभापती पांडुरंग नागरगोजे व इतर मान्यवर उपस्थित होते. सकाळी साडेआठ वाजता महेश मंदिरात महाजलाभिषेक व पर्जन्ययागाला सुरूवात झाली.

माजी आ. भीमराव धोंडे यांनी पुढे बोलताना सांगितले की, यापूर्वी शासनाने पावसासाठी अनेक प्रयोग केले. जागतिक पातळीवर वैज्ञानिकांनी पाऊस पडावा यासाठी नविन तंत्रज्ञान विकसित केल्यास सर्वांना याचा फायदा होईल. पावसासाठी महाजलाभिषेक व पर्जन्ययाग हा जिल्ह्यातील पहिला प्रयोग झाला आहे. यज्ञ ही भारतीय जुनी परंपरा आहे. यज्ञ केल्यावर फळ मिळते,भरपूर पाऊस येईल असा मला विश्वास आहे. यावेळी माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी सांगितले की, शेतकरी एक महिना झाला पावसाची वाट पहात आहे, गतवर्षी भरपूर झाला होता.आज



शेतकऱ्यांसह पुणे मुंबईला देखील पावसाची गरज आहे. पावसासाठी कडा येथील महेश मंदिरात केलेल्या महाजलाभिषेक

व पर्जन्ययागाचा निश्चित फायदा होईल. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगितले की, भारतीय पुराणात सांगितल्याप्रमाणे पर्जन्य याग केल्यानंतर पाऊस पडतोच,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले प्रमाणे प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे.

यावेळी ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, ॲड. भाऊसाहेब लटपटे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे व इतरांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाटोदा करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी सांगितले की, आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यासह महाराष्ट्रात भरपूर पाऊस पडावा म्हणून शेतकऱ्यांचे नेते माजी आ. भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या उपस्थितीत महाजलाभिषेक व पर्जन्ययाग करण्यात आला. याचा निश्चित फायदा होईल. यावेळी ह.भ.प. आंधळे महाराज, ॲड. भाऊसाहेब लटपटे, चेअरमन राजेश धोंडे, किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष बबनराव औटे, नानाभाऊ वाडेकर, महेश कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, पांडुरंग गावडे, नानाभाऊ वाडेकर, महेश कारखान्याचे संचालक बजरंग कर्डीले, रत्नदीप निकाळजे, बाबा वाघुले, अंकुश मुंढे, मधुकर शिरोळे, अनिल जायभाय, डी. के. कर्डीले, राम कर्डीले, ह.भ.प. पांडुरंग महाराज कर्डीले, माजी सरपंच झुंबर चव्हाण, राजाबापु नलावडे, काकासाहेब कर्डिले, दगडू पारखे, हरिभाऊ जंजिरे,

प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, ह.भ.प. मोरे महाराज, माजी सरपंच संतोष चव्हाण, प्राचार्य डॉ. भगवान वाघुले, विठ्ठल लांडगे, जि.प. चे माजी सदस्य सतीश झगडे, दहातोंडे, चंद्रशेखर साके, प्राचार्य डॉ. संभू वाघुले, घुले, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, तावरे, प्रा. शिवदास विधाते, डॉ. डी. बी. राऊत, सरपंच माऊली वाघ, प्रा. डॉ . बाळासाहेब धोंडे,माऊली बोडखे, संजय शेंडे, प्रा. डॉ. शाम सांगळे,

यांच्यासह परिसरातील महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आष्टी तालुका किसान मोर्चाचे अध्यक्ष बबनराव औटे यांनी माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. बाळासाहेब आजबे यांचा सत्कार केला तसेच सौ. सिंधुताई औटे यांनी सौ. दमयंतीताई धोंडे व सौ. सविता आजबे यांचा सत्कार केला.याप्रसंगी महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांच्या उपस्थितीत पर्जन्य देवतेला प्रार्थना करण्यात आली. महेश कारखान्याचे संचालक रत्नदीप निकाळजे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### ५१ पौराहित्य, ५१ जोड्या

**प्रारंभी महेश मंदिरात सौ. दमयंतीताई भीमराव धोंडे, सौ. अक्षदा अजय धोंडे,सौ. पायल अभय धोंडे यांनी जोडीने महादेवाला महाजलाभिषेक केला त्यानंतर उपस्थित प्रत्येकाने जलाभिषेकात सहभाग घेतला. यावेळी सदानंद जोशी, महेश जोशी, योगेश जोशी, पिनू देवा, पोतदार देवा, अनिल जोशी, अनिल भिवरे, दीपक भिवरे, सूर्यकांत वाळूंजकर,संतोष देवा जोशी यांच्या सह ५१ पौराहित्यांनी पर्जन्ययागाचे पौराहित्य केले केले. सौ. दमयंतीताई भीमराव धोंडे, सौ. सविता बाळासाहेब आजबे,सौ. अक्षदा अजय धोंडे,सौ. पायल अभयराजे धोंडे, सौ. सिंधुताई बबनराव औटे, सौ. मंगलताई हरिदास विधाते, सौ. वंदना सुनिल गाडे, सौ. चक्रवर्ती शाम सांगळे यांच्या सह ५१ जोड्या पर्जन्ययागाच्या विधीसाठी बसल्या होत्या.**

# सिद्धार्थ विद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** : सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, सावरी/मुरमाडी येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. याप्रसंगी अध्यक्षस्थानी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक न्याय, शिक्षणाचा प्रसार, समता आणि बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी केलेल्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले.

तसेच प्रमुख पाहुण्यांनी शाहू महाराजांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, शिक्षणातील योगदान आणि आरक्षणाच्या माध्यमातून वंचित समाजाला



दिलेल्या न्यायाविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास विद्यालयातील मनोज खोब्रागडे, विकास काशिवार, भरत राऊत, मेमन सर, आशिष सिंगनजुडे, शिरीष लोगडे, विजय रिनाईत, सुभाष ठाकरे, मनीषा सुखदेवे, स्मिता आगाशे, कविता साठवणे, प्रतिभा अगळे, सुरेखा गभणे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे वातावरण प्रेरणादायी व उत्साहपूर्ण होते. उपस्थितांनी छत्रपती शाहू महाराजांच्या समता, बंधुता आणि शिक्षणप्रेमाच्या विचारांचे स्मरण करून ते आपल्या जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प व्यक्त केला.

# कोक्रोच जनता पार्टी च्या आंदोलना ला पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** - देशात नीट चे पेपर फुटल्यामुळे परीक्षा देणाऱ्या 17 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. नीट ची परीक्षा सुरळीत पार पडली असती तर या विद्यार्थ्यांचा जीव वाचला असता. मात्र देशाचे शिक्षण मंत्री व शिक्षण विभाग तसेच परीक्षा घेणाऱ्या व्यवस्थेच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे परीक्षेचे पेपर 15, 15 लाखात विकल्या गेले. यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न धुळीस मिळाले.

देशात आजपर्यंत 80 पेक्षा जास्त वेळा पेपर फुटले ज्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे जीवन उध्वस्त झाले. या सर्व गैरप्रकाराला केंद्राचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान हेच सर्वस्वी जबाबदार आहेत. त्यांनी त्यांची नैतिक जवाबदारी समजून आपल्या मंत्री पदाचा राजीनामा द्यायला पाहिजे होता. परंतु ते आजही आपल्या खुर्चीला घट्ट चिकटून बसले आहेत. पेपर फूट हीं केंद्र सरकारच्या




शिक्षण विभागाच्या नाकर्तेपणाचा कळस आहे. म्हणून सरकारने प्रधान यांची तात्काळ पदावरून हकालपट्टी करावी.

धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनाम्या च्या मागणी करिता देशातील युवकांनी काक्रोच जनता पार्टी च्या बॅनर खाली अभिजित दिपके यांच्या नेतृत्वात दिल्ली मधील जंतर मंतर वर 20 जून पासून आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनास भंडारा येथील संविधान बचाव संघर्ष समिती ने पाठिंबा जाहीर केलेला आहे.

संविधान बचाव संघर्ष समितीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करून मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना निवेदन दिले.

अभिजित दिपके यांच्या नेतृत्वात अत्यंत शांततेत सुरु असलेल्या आंदोलनातील सहभागी विद्यार्थ्यांना,युवकांना पाकिस्तानी, आतंकवादी संबोधणाऱ्या लोकांचा, तसेच आंदोलकांचे पाणी, व अन्नपूरवठा रोकणाऱ्या यंत्रणेचा निषेध,व असा आदेश देणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

एक दिवसीय धरणे आंदोलनातं जिल्हाध्यक्ष रोशन जांभुळकर, मुख संयोजक सदानंद इलमे, कार्याध्यक्ष चंद्रशेखर टेम्भूरणे, महासचिव गोपाल सेलोकर, सचिव असित बागडे, अजाबराव चिचामे, डॉ. बाळकृष्ण सार्वे, हिवराज उके, रोशन उरकुडे, अमृत बन्सोड, रुपचंद रामटेके, ग्यानचंद जांभुळकर, राजेश मडामे, भगीरथ धोटे,पंजाबराव कारेमोरे, वामनराव गोंधळे, विजय भोवते, आशिष गोस्वामी यांच्यासोबत अनेक कारकर्ते उपस्थित होते.

# जीवघेणा इशारा! काटा–आमखेडा–जोडगव्हाण मार्गावरील पूल धोक्याच्या उंबरठ्यावर; मोठ्या दुर्घटनेची भीती!

## वाशिम तालुक्यातील पांगरी धनकुटे गावासमोरील पुलाची अत्यंत दयनीय अवस्था; वारंवार तक्रारी करूनही जिल्हा परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष, ग्रामस्थांचा संताप



**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : पांगरी धनकुटे (वाशिम) तालुक्यातील काटा–आमखेडा–जोडगव्हाण या महत्त्वाच्या ग्रामीण मार्गावरील वाशिम तालुक्यातील पांगरी धनकुटे गावासमोरील पूल अत्यंत धोकादायक अवस्थेत पोहोचला असून, संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पुलाचा मोठा भाग खचला असून संरचना कमकुवत झाल्याने मोठ्या पावसात किंवा पुराच्या पाण्याच्या तडाख्यात हा पूल वाहून जाण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे.

या पुलावरून दररोज शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकी, चारचाकी आणि मालवाहू वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. पुलाची सद्यस्थिती पाहता कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडू शकते. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा मुसळधार पावसात वाहनचालकांना पुलाच्या खचलेल्या भागाचा अंदाज न आल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या मार्गालगत आमखेडा येथे कृषी महाविद्यालय असून, पुढे पिंपळा येथील श्री पांडुरंग माध्यमिक विद्यालयही आहे. या दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये वाशिम शहरातून अनेक शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी दररोज या पुलावरून प्रवास करतात. त्यामुळे या पुलाची धोकादायक अवस्था केवळ स्थानिक ग्रामस्थांसाठीच नव्हे, तर शेकडो विद्यार्थी व शिक्षकांच्या सुरक्षिततेसाठीही गंभीर धोका निर्माण करणारी ठरत आहे.स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या पुलाबाबत संबंधित जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र अद्यापही कोणतीही ठोस दुरुस्ती किंवा संरक्षणात्मक

> **"पूल कोसळण्याची वाट पाहताय का? वारंवार तक्रारी करूनही अधिकारी दखल घेत नाहीत. या पुलावरून दररोज विद्यार्थी, शिक्षक, शेतकरी आणि नागरिक जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. कोणाचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?"**
> **– पांगरी धनकुटे ग्रामस्थ**

उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामस्थांनी असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे की, "एखाद्याचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का?" पुलाची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत असताना संबंधित अधिकारी मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.हा रस्ता जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत असल्याने संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पुलाची पाहणी करावी, त्वरित दुरुस्तीचे काम हाती घ्यावे आणि मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी पुलाचे मजबुतीकरण करावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

याचबरोबर स्थानिक आमदारांनीही या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष घालून निधी उपलब्ध करून पुलाच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.वेळीच या पुलाची दुरुस्ती न झाल्यास एखाद्या मुसळधार पावसात पूल वाहून जाण्याची शक्यता असून, त्यातून मोठी जीवित व वित्तहानी होऊ शकते. भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी व प्रशासनावर राहील, असा स्पष्ट इशाराही पांगरी धनकुटे येथील ग्रामस्थांनी दिला आहे.

# ग्रामीण क्रीडा प्रतिभेला संधी देणे ही काळाची गरज; राष्ट्रनिर्मितीसाठी क्रीडा विकास महत्त्वाचा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : ग्रामीण भागातील मुला-मुलींमध्ये नैसर्गिकरित्या जिद्द, मेहनत, सहनशक्ती आणि संघर्ष करण्याची क्षमता असल्याने ते उत्कृष्ट खेळाडू बनू शकतात. मात्र त्यांना आवश्यक सुविधा, प्रशिक्षित मार्गदर्शन आणि योग्य संधी मिळणे गरजेचे आहे. ग्रामीण क्रीडा विकास ही केवळ क्रीडा क्षेत्राची गरज नसून राष्ट्रनिर्मितीची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन क्रीडा शिक्षक तथा क्रीडा सह्याद्री फाउंडेशन, नाशिकचे अध्यक्ष आणि टेनिस क्रिकेट असोसिएशन, नाशिकचे सचिव विलास गायकवाड यांनी केले आहे.

'ग्रामीण भागातील क्रीडा प्रतिभा आणि संधी' या विषयावर लिहिलेल्या आपल्या लेखातून त्यांनी ग्रामीण भागातील क्रीडा विकासाचे वास्तव, आव्हाने आणि भविष्यातील संधी यावर सविस्तर भाष्य केले आहे.

त्यांनी नमूद केले की, भारत हा गावांचा देश असून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर क्रीडा गुणवत्ता दडलेली आहे. शेतातील कामे, दैनंदिन श्रम, मैदानी जीवन आणि साधी राहणी यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये ताकद, चपळता, सहनशक्ती आणि चिकाटी यांसारखे गुण नैसर्गिकरीत्या विकसित होतात. त्यामुळे धावणे, कबड्डी, खो-खो, कुस्ती, व्हॉलीबॉल, ॲथलेटिक्स, क्रिकेट अशा विविध क्रीडा प्रकारांमध्ये ग्रामीण खेळाडू उल्लेखनीय कामगिरी करत असल्याचे त्यांनी सांगितले.मात्र या गुणवत्तेला पुढे नेण्यासाठी अनेक अडचणी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. ग्रामीण भागात दर्जेदार क्रीडांगणांचा अभाव, क्रीडा साहित्याची कमतरता, प्रशिक्षित प्रशिक्षक



नसणे, योग्य आहार व वैद्यकीय सुविधांचा अभाव, आर्थिक अडचणी तसेच स्पर्धांसाठी लागणारा प्रवास खर्च, क्रीडा साहित्य आणि गणवेशासाठी निधी उपलब्ध न होणे यामुळे अनेक गुणवंत खेळाडू संधीपासून वंचित राहत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.गेल्या काही वर्षांत शासनाने ग्रामीण क्रीडा विकासासाठी विविध योजना सुरू केल्या असून शालेय क्रीडा स्पर्धा, जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे, निवड चाचण्या, क्रीडा अकादमी आणि ग्रामीण क्रीडा महोत्सव यांसारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना मोठे व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचे गायकवाड यांनी नमूद केले.

ग्रामीण क्रीडा विकासात शाळा आणि क्रीडा शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखणे, योग्य खेळाची निवड करून देणे, नियमित सराव, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, संघभावना आणि स्पर्धांमध्ये सहभाग यासाठी क्रीडा शिक्षकांनी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे

> **ग्रामीण भागातील खेळाडूंना सुविधा, मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास ते राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकू शकतात – विलास गायकवाड**

मत व्यक्त केले. योग्य शिक्षकाचे मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवू शकतो, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

क्रीडा ही केवळ पदके जिंकण्यासाठी नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगताना त्यांनी खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, सहकार्याची भावना, शिस्त, परिश्रमाची सवय आणि संकटांवर मात करण्याची क्षमता विकसित होत असल्याचे स्पष्ट केले.प्रत्येक शाळेत नियमित क्रीडा तास, गावपातळीवर क्रीडांगणांची उभारणी, स्थानिक स्पर्धांचे आयोजन, गुणवंत खेळाडूंना शिष्यवृत्ती व आर्थिक मदत, मुलींना समान आणि सुरक्षित संधी तसेच पालकांचा सकारात्मक सहभाग या बाबींवर विशेष भर देण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक संस्था, माजी खेळाडू आणि क्रीडाप्रेमींनी एकत्र येऊन ग्रामीण क्रीडा विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.ग्रामीण भारताच्या मातीमध्ये अमाप क्रीडा शक्ती दडलेली असून तिला योग्य दिशा, सुविधा आणि सातत्यपूर्ण पाठबळ मिळाल्यास भविष्यात ग्रामीण भागातीलच खेळाडू राज्य, देश आणि जगाच्या पातळीवर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवतील, असा विश्वास विलास गायकवाड यांनी व्यक्त केला.